فَاٰمِنُوۡا بِاللّٰہِ وَرَسُوۡلِہٖ وَالنُّوۡرِ الَّذِیۡۤ اَنۡزَلۡنَا
وَاللّٰہُ بِمَا تَعۡمَلُوۡنَ خَبِیۡرٌ
(अत् तगाबुनः९)

# विवाहविषयक
## दोन महत्त्वपूर्ण प्रवचन

**प्रवचन**
हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद
अपेक्षित मसीहाचे पंचम खलीफा
(अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो)

**अनुवादकः**
खान मामून अहमद एतेज़ाज़
(मुरब्बी सिलसिला, एम.ए.मराठी),
प्रमुख मराठी विभाग

मुद्रण :
फजले उमर प्रिंटींग प्रेस,
कादियान, भारत.

رشتہ ناطہ سے متعلق
حضرت خلیفۃ المسیح الخامس ایدہ اللہ تعالیٰ
کے دو اہم خطبات

Two Important Friday Sermons
Regarding Matrimonial Mattaers
By
Hazrat Mirza Masroor Ahmad
Khaliftul Messiah V (abt)
Urdu

**Marathi Translation**
Vivah Vishyk Dōn Mahatwapurn
Prawachan
By
Khan Mamoon Ahmed Etyzaz
(Murabbi, M.A.,Incharge Marathi Desk)


First Edition : 2023
Copies : 500
Printed at : Fazl-e-Umar Printing Press Qadian
Published by : Nazarat Nashr-o-Isha'at,
Sadr Anjuman Ahmadiyya Qadian
Dist: Gurdaspur, Punjab, India,143516

अधिक माहितीसाठी संपर्क करा

www.alislam.org
www.ahmadiyyamuslimjamaat.in
Toll Free No: 1800-103-2131

## प्रकाशकाकडून

मज्लिस ए शूरा (सल्लागार समिती) भारत द्वारे, २०१९ मध्ये एक प्रस्ताव मांडण्यात आला की हजरत मिर्ज़ा मसरुर अहमद, (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) अपेक्षित मसीहाचे पंचम खलीफा आणि जागतिक प्रमुख अहमदिया मुस्लिम जमाअत, चे दोन महत्त्वपूर्ण प्रवचन (दि. २४ डिसेंबर २००४ आणि १५ जानेवारी २०१०) जे विवाहसोहळा संदर्भात आहेत, यांना भारतातील अशा सर्व प्रादेशिक भाषांमध्ये प्रसिद्ध केले जावे जिथे अहमदी लोकांची संख्या पुष्कळ प्रमाणात आहे.

हुजूर अन्वर (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) यांनी प्रेमपूर्वक हा प्रस्ताव पारित केला आणि यास प्रसिद्ध करण्याची परवानगीही दिली.

सल्लागार समितीच्या या स्वीकृत प्रस्तावानुसार हुजूर चे हे दोन प्रवचन पुस्तकास्वरूपात प्रकाशित करण्याचे सौभाग्य नजारत नश्रो ईशाअत, कादियान ला प्राप्त होत आहे. या पुस्तकाचे अनुवाद मौलवी खान मामून अहमद साहेब (एम.ए) यांनी केले आहे तसेच पुस्तकाची टाईपिंग आणि सेंटींग देखील त्यांनीच केलेली आहे. अल्लाह त्यांना या कार्याचे उत्तम प्रतिफल देवो आणि हे पुस्तक लोकांच्या प्रबोधनाचे माध्यम होवो. आमीन.

विनीत
हाफीज़ मख़दूम शरीफ
प्रमुख, नज़ारत नश्रो ईशाअत, भारत

# विधवा आणि विवाहयोग्य मुलां-मुलींच्या विवाहासंदर्भात पवित्र कुरआन, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) आणि हजरत अपेक्षित मसीह यांचे अतिशय महत्त्वाच्या आणि आवश्यक सूचना.

खुतबा (प्रवचन) हजरत मिर्ज़ा मसरुर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा, (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २४ दिसंबर, २००४, (२४ फतह १३८३ हिजरी शम्सी), स्थान मशिद बैतुस्सलाम, पॅरिस, फ्रांस

أَشْهَدُ أَنْ لَّا إِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيکَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَ رَسُوْلُهٗ۔ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔

اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعَالَمِيْنَ۔اَلرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔مٰلِکِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاکَ نَعْبُدُ وَ اِيَّاکَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِالْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَاالضَّآلِّيْنَ۔

وَاَنْكِحُوْا الْاَيَامٰى مِنْكُمْ وَالصّٰلِحِيْنَ مِنْ عِبَادِكُمْ وَاِمَآئِكُمْ۔اِنْ يَّكُوْنُوْا فُقَرَآءَ يُغْنِهِمُ اللّٰهُ مِنْ فَضْلِهٖ۔ وَاللّٰهُ وَاسِعٌ عَلِيْمٌ۔ (अन् नूर ३३)

आजकाल वैवाहिक संदर्भातील अनेक अडचणी उद्भवत आहेत. दैनंदिन पत्रांमध्ये याचे वर्णन होत असतात. मुली, स्त्रियांकडून, मुलींच्या नातेसंबंधाच्या समस्या कळतात. मुलगा असो की मुलगी, जे आर्थिकदृष्टया सबळ नाहीत त्यांच्या लग्नात अडचणी येतात. तसेच विधवांच्या विवाह संबंधातही अडचणी आहेत. काही विधवा आहेत, ज्या विवाहासाठी पात्र आहेत किंवा काही ज्यांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी लग्न करायचे आहे, त्यांचे विवाह होण्यातही समस्या आहेत. पण अशा विधवा, समाजाच्या प्रतिक्रियेला घाबरून लग्नाची गरज जाणूनही लग्न करत नाहीत. तर प्रत्येक पातळीवर विविध समस्या आहेत. काहीं पौर्वात्य देशांत विधवांच्या पुनर्विवाहाला अत्यंत वाईट मानले जाते किंबहुना गुन्हा मानले जाते. आणि काहीं गरीब स्त्रिया ज्यांना त्यांच्या परिस्थितीमुळे लग्न

करायचे असते आणि त्यांचे नातं देखील जोडले जाते; परंतु मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या नातेवाईकांच्या कठोर प्रतिक्रियेमुळे त्या विवाह करण्यापासून परावृत्त राहतात. आणि अशा स्त्रीबद्दल लोक असे वक्तव्य करतात ज्यामुळे तिचं जीवन अवघड होऊन जाते. आणि आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे इथे युरोप मध्ये येऊन ते इतर प्रकरणांमध्ये स्वतःला आधुनिक आणि उदारमतवादी दर्शवतात; ज्यामधील काहींच्या बाबतीत इस्लामही परवानगी देत नाही; पण सर्वशक्तिमान अल्लाहचा हा जो आदेश आहे की विधवांचे लग्न करा, याबद्दल स्वाभिमान दाखवतात.

मी पठन केलेल्या या आयत मध्ये सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, ''आणि तुमच्यामध्ये असलेल्या विधवा, आणि (विवाहासाठी) योग्य असलेले तुमचे दास आणि दासी यांचे विवाह करून द्या. जर ते निर्धन असतील तर अल्लाह आपल्या कृपेने त्यांना निर्वाहसाधन देईल; आणि अल्लाह मोठा उदार व सर्वज्ञ आहे.''

हा सर्वशक्तिमान अल्लाहचा आदेश आहे, ज्याचे पालन प्रत्येकाने केले पाहिजे. सर्वशक्तिमान अल्लाह अगदी स्पष्टपणे सांगतो की जर समाजात धार्मिकता वाढवायची असेल तर समाजातील विवाहयोग्य विधवांचेही लग्न लावा, किंबहुना त्या काळात जे गुलाम-दासी होते, त्यातील जे चांगले व सदाचारी होते त्यांचेही विवाह करा, जेणेकरून दुराचार पसरता कामा नये. आणि निर्धन असलेल्या या लोकांनीही निराशेला बळी पडू नये. त्यामुळे हा आदेश अंमलात आणणे गरजेचे आहे. या काळात गुलामगिरी पद्धत नाही, पण अनेक देशांत गरिबी आहे आणि गरिबीमुळे विवाह होत नाही, तर जमाअत अशा लोकांची सहाय्यता करते. तसेच वैयक्तिक स्वरूपातही काही लोक मदत करतात आणि त्यांनी ती करावी सुद्धा.

पवित्र कुरआन असे सांगते की, त्यांची दुर्बल स्थिती पाहून त्यांचे लग्न होऊ नये असा विचार मनात ठेवणे चूकीचे आहे. जर माणूस काम करत नसेल किंवा त्याच्याकडे रोजगार नसेल किंवा उपजीविकासाठी कोणतेही मोठे साधन नसेल तरी त्याचे लग्न लावून द्या आणि नंतर जमाअतमधील (निज़ाम) व्यवस्थापन अंतर्गत अशा व्यक्तिला व्यवसाय सुरू करण्यास मदत करा. आणि किंचित व्यक्तिंना सोडले गेले तर बहुसंख्यांमध्ये लग्नानंतर मुलां-बाळांची जबाबदारी उचलण्याची समज अपोआप निर्माण होते, ज्याकरिता ते स्वतःच्या परिवाराच्या निर्वाहासाठी नोकरी करतात, काही व्यवसाय करू पाहतात. मग अनेक स्त्रिया सुद्धा पतीला काही काम करायला किंवा रोजगार मिळवण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कारण बनतात. पत्नीनेही त्यावर दबाव आणला तर यातूनही तो सक्रिय होतो. आणि अशी अनेक उदाहरणे आहेत की लग्नानंतर अशा गरीबांची अवस्था समृद्ध झाली. तर सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की हे सर्व अल्लाहचे काम आहे. कोणाचे काय होणार आहे याचे ज्ञान फक्त त्याला आहे. म्हणून विधवा असोत वा गरीब असोत, त्यांचे लग्न लावून देण्यासाठी प्रयत्न करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. अशा स्वरूपाचे समाज अनेक दुष्कृत्यांपासून पवित्र होईल, सुरक्षित होईल.

(हुजूर सांगतात) मी म्हटल्याप्रमाणे, लग्न करू पाहणाऱ्या असंख्य विधवा आहेत आणि नवऱ्याच्या मृत्यूनंतर सामाजिक समस्यांमुळे त्रस्त विधवाही मोठ्या संख्येत आहेत. समाजाच्या काही समस्या आहेत, त्यात त्या संघर्ष करत आहेत आणि त्यातून सुटकेसाठी त्यांना एक ठिकाण मिळावे, अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळे असे सांगण्यात आले की, पवित्र समाजाच्या भल्यासाठी आणि त्यांच्या वैयक्तिक समस्यांच्या

निवारणासाठी त्यांचे लग्न करुन देण्यासाठी प्रयत्न करा. तर हा अल्लाहचा आदेश आहे जो काहीं समाजांना आवडत नाही. आणि इस्लामिक आणि अहमदी समाजपैकी असूनही काहीं लोक यास नापसंत करतात. म्हणून प्रत्येक अहमदीने हे लक्षात ठेवले पाहिजे की आमचे रिती-रिवाज, म्हणजे चूकीची परंपरा जे आपल्यामध्ये इतर धर्माच्या किंवा गैर-मुस्लिमांच्या बिघडलेल्या धर्माचा भाग म्हणून वाढत आहेत आणि प्रगती करत आहे त्यांना बाहेर काढणे आवश्यक आहे.

सर्वशक्तिमान अल्लाह विधवांना परवानगी देतो की जर एखाद्याचा पती मरण पावला, तर त्यानंतर इद्दतची (विहित मुदत) कालावधी, जी चार महिने आणि दहा दिवस आहे, ते पूर्ण झाल्यावर तुम्ही स्वच्छेने लग्न करू शकता यात काहीही अडचण नाही. याबद्दल कोणाकडून निर्णय घेण्याची किंवा सल्ला मसलत करण्याची गरज नाही. पण अट अशी आहे की मारूफने (म्हणजे पवित्र कुरआनच्या आदेशानुसार) संबंध ठरवावेत. हे लग्न होत आहे हे जर समाजाला माहीत असेल तर कोणतीही अडचण नाही. त्यामुळे विधवांना त्यांच्या भवितव्याबद्दल स्वत:चा निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे आणि परवानगी प्राप्त झाली आहे आणि लोकांना सांगण्यात आले आहे की, तुम्ही विनाकारण ते थांबवण्याचा प्रयत्न करू नका आणि आपल्या नाते-संबंधांचा संदर्भ देऊन अडचण आणण्याचा प्रयत्न करू नका. जर या विधवांचे संबंध वैध आणि कायदेशीररित्या केले जात असतील तर सर्वशक्तिमान अल्लाह तिला असे करण्यास परवानगी देतो, यात तुमच्यावर कोणताही पाप नाही. स्वत:ला कुटुंबाचा मोठा सदस्य समजून किंवा एखाद्या मोठ्या नात्याचा हवाला देऊन हे नाते चांगले नाही, होऊ नये किंवा योग्य नाही असे सांगून अडवू

नका. विधवेला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तुम्ही प्रत्येक प्रकारच्या जबाबदारीपासून मुक्त आहात. अल्लाह तुमच्या हृदयाची स्थिती देखील जाणतो, जर काही कारणास्तव तुम्ही हे लग्न होऊ नये या चांगल्या हेतूने थांबवण्याचा किंवा तुमचे मत पटवण्याचा प्रयत्न करत असाल, तर तुमच्या हृदयात जे आहे ते प्रदर्शित करा, स्पष्टपणे एकदा सांगा आणि मग मागे व्हा आणि निर्णयाचा अधिकार त्या विधवास्त्रीला बहाल करा. अल्लाहला तुमच्या हृदयाची स्थिती माहित आहे, त्याला तुमचा हेतू माहित आहे, याबद्दल तुम्हाला अजिबात विचारले जाणार नाही. जर तुमचा हेतू चांगला असेल तर तुम्हाला चांगल्या हेतूचे बक्षीसही मिळेल.

सर्वशक्तिमान अल्लाह याबद्दल सांगतो:

وَالَّذِيْنَ يُتَوَفَّوْنَ مِنْكُمْ وَيَذَرُوْنَ اَزْوَاجًا يَّتَرَبَّصْنَ بِاَنْفُسِهِنَّ اَرْبَعَةَ اَشْهُرٍ وَّعَشْرًا ۔ فَاِذَا بَلَغْنَ اَجَلَهُنَّ فَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ فِيْمَا فَعَلْنَ فِيْٓ اَنْفُسِهِنَّ بِالْمَعْرُوْفِ ۔ وَاللّٰهُ بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرٌ.

अर्थात-आणि तुमच्यापैकी जे मरण पावतात व आपल्या पत्न्या मागे सोडून जातात, तेव्हा त्या (पत्नींनी) स्वतः चार महिने दहा दिवस प्रतीक्षा करावी. आणि जेव्हा त्यांचा नियत कालावधी पूर्ण होईल तेव्हा त्या स्वतःच्या बाबतीत चांगल्या रीतीने जे काही करतील त्यामुळे तुम्हाला कोणतेही पाप लागणार नाही. आणि तुम्ही जे काही करत आहात त्याची अल्लाहला जाणीव आहे. (अल् बक़राह २३५)

हजरत अपेक्षित मसीह(परमेश्वराची कृपा त्यांना लाभो) याविषयी म्हणतात:

''विधवेच्या लग्नाचा आदेश हा बकिरा (अविवाहित मुलीच्या) विवाहाच्या

आदेशासारखाच आहे. कारण काही समाज विधवा स्त्रीच्या लग्नाला सन्मानाच्या विरुद्ध मानतात आणि ही दुष्ट विचारसरणी व्यापक आहे. म्हणून विधवांसाठी विवाह करण्याचा आदेश आवर्जून दिला गेला आहे; पण याचा अर्थ असा नाही की प्रत्येक विधवा स्त्रीचे लग्न झालेच पाहिजे. लग्न ज्याच्यासाठी योग्य आहे आणि ज्याच्यासाठी विवाह आवश्यक आहे त्याचेच होणे बरे. काही स्त्रिया वृद्ध झाल्यावर विधवा होतात. इतर परिस्थिती जसे की ती लग्नासाठी योग्य नाही, जसे की एखाद्याला असा आजार झाला की ती लग्न करू शकत नाही किंवा जास्त मुले आणि संबंधानंतर आता दुसरे लग्न करण्याची इच्छा नाही. अशा परिस्थितीत स्त्रीला विनाकारण पतीशी बांधून ठेवण्याची सक्ती नाही. होय, विधवा स्त्रीला आयुष्यभर पतीशिवाय बळजबरीने जखडून ठेवणे ही दुष्ट प्रथा बंद झाली पाहिजे.''

(मल्फ़ूज़ात, खंड पाचवा पान ३२०, नवीन आवृत्ती)

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी याचे स्पष्टीकरण केले आहे, आणि अधिक स्पष्टपणे सांगितले आहे की, पहिली गोष्ट म्हणजे समाज आणि नातेवाईकांना आदेश आहे की जर कोणी लग्नाच्या वयात विधवा झाली तर तुम्ही तिच्या लग्नासाठी तसाच प्रयत्न करा जसा एखाद्या अविवाहित कुमारी साठी करतात. यात तुमचा अपमान नव्हे तर सन्मान आहे. दुसरे असे की, वयापेक्षा जास्त किंवा मुलांची संख्या अधिक असल्यामुळे किंवा इतर काही परिस्थितीमुळे किंवा कोणत्याही आजारामुळे तिला लग्न करायचे नसेल, तर हे निर्णय घेण्यात ती स्वातंत्र्य आहे. तुम्ही तुमचे मत प्रकट करा आणि नंतर मागे व्हा. निर्णय घेण्याचा हक्क तिला प्राप्त आहे; तिच्यावर कोणत्याही प्रकारे बळजबरी केली जाऊ नये. मग

एखाद्या विधवेला बळजबरीने आयुष्यभर विधवा म्हणून ठेवण्याचा किंवा आयुष्यभर विधवा राह असे सांगण्याचा समाजाला किंवा नातेवाइकांना अधिकार नाही. जर एखाद्या विधवा ला स्वेच्छेने लग्न करायचे असेल तर तिने पवित्र कुरआनच्या आदेशानुसार लग्न करावे. विधवेला लग्नापासून थांबवणे ही अत्यंत निरर्थक आणि अनुचित परंपरा आहे.

एका कथनात हजरत अली बिन अबी तालिब (र.ज.) सांगतात की पवित्र पैगंबर (स.) यांनी त्यांना तीनदा म्हटले - ''हे अली! जेव्हा प्रार्थनेची वेळ येते तेव्हा उशीर करू नको आणि त्याचप्रमाणे जेव्हा मृतदेह हजर असेल किंवा स्त्री विधवा असेल आणि तिच्यासाठी योग्य वर मिळाल्यावर, उशीर करू नको.''

(तिरमिधी, किताबुस्सलात, बाब फिल वक्तिल अव्वल)

तर यामध्ये पवित्र पैगंबर (स.) यांनी मानवजीवनातील या दोन गोष्टींना, (इबादत) प्रार्थनासोबत सांगून त्यांचा महत्त्व पठवून दिला आहे. सर्वशक्तिमान अल्लाह पुढे नतमस्तक होण्यासाठी नमाज अदा करणे हे कर्तव्य आहे आणि उपासनेच्या उद्देशानेच मनुष्याची निर्मिती झाली आहे. हे नियमित आणि निर्धारित वेळेवर अदा करण्याचा आदेश आहे आणि जेव्हा नमाजाची वेळ येईल तेव्हा यात विलंब होता कामा नये, यामध्येच आमचा लाभ आहे. आणि पवित्र समाजाच्या स्थापनेची खात्री यातच आहे की अल्लाहाने निश्चित केलेल्या वेळे मध्ये नमाज अदा केली पाहिजे. आणि यानंतर ते (पैगंबर स.) म्हणाले की ज़नाजा (अंत्यसंस्कार) आहे, की जर एखाद्याची मृत्यु झाली तर त्याला दफन करण्यात विलंब करू नका. मग काही कुटुंबांमध्ये दीर्घकाळ अंत्यसंस्कार ठेवल्यानेही अनेक समस्या उद्भवतात, त्यामुळे लवकर दफन करा. आणि मग पुढे म्हणाले

की जर एखादी स्त्री विधवा झाली आणि ती विवाहयोग्य असली आणि तिच्यासाठी योग्य वर सापडला, तिला योग्य स्थळ मिळाला, समाजात त्या स्त्रीच्या ऐपतीनुसार, कुटुंबाच्या दृष्टीने, तिच्या राहणीमानाच्या बाबतीत तो सलग्न असला आणि तिला पसंत पडला तर नातेवाइकांनी तिला याबाबतीत अडवू नये, तर तिचे लवकरात लवकर लग्न करून द्यावे. आणि असे केल्याने विधवा झाल्यामुळे तिला सहन कराव्या लागणाऱ्या समाजाच्या अनेक गोष्टींपासून तिची सुद्धा सुटका होईल. आणि पवित्र कुरआनुसार विधवेला स्वतः कायदेशीर विवाह करण्याचा अधिकार प्राप्त आहे. आणि हे फक्त तिच्या अब्रूच्या संरक्षणासाठी तिला बहाल करण्यात आले आहे.

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या अधिकाराचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले आहे की, इब्न अब्बास (र.ज.) सांगतात की पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असे सांगितले की, ''विवाहाच्या बाबतीत विधवा स्त्रीला निर्णय घेण्यात तिच्या वली (पालक) पेक्षा जास्त अधिकार प्राप्त आहे. आणि कुमारीकडून तिची परवानगी घेतली जाईल आणि याबाबतीत तिच्या मौनावस्थेला तिची स्वीकृती मानले जाईल.''

(सुनन अलदारमी, किताबुन्निकाह, बाब इस्तिमरुल बिकर वा साब)

त्यामुळे हे स्पष्ट झालं की विधवा चा हक्क सर्वतोपरी आणि निर्णायक आहे; परंतु अविवाहित मुलीच्या बाबतीत, तिच्या वलीने अर्थात पालकने तिच्याविषयी निर्णय घ्यावा अशी अट आहे आणि ते यामुळे कारण अल्लाहचे आदेश खरोखर समाजात चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी आहे आणि समाजात शांतता कायम राखण्यासाठी आहे. राहिला विधवाचा हक्क तर, कारण ती जगाच्या अनुभवातून गेली आहे,

तिने जगातील उच्च आणि तुच्छ जाणवले आहे आणि आपल्याविषयी निर्णय घेऊ शकते, म्हणून परमेश्वराने हा अधिकार तिला बहाल केलं आहे. पण अविवाहीत मुलगी कधी कधी अज्ञान किंवा चुकून चूकीचा निर्णय घेऊ शकते; म्हणून तिचा संबंध जोडण्याचा अधिकार तिच्या पालकाला प्राप्त आहे. आणि जर तिला (अविवाहित मुलीला) तिच्या वली किंवा वडिलांच्या निर्णयाशी संमती नसल्यास निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे आणि जमाअत च्या व्यवस्थापन मंडळीला कळवण्याचे आणि स्वतःच्या हितानुरूप निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला प्राप्त आहे; परंतु स्वतःकडून कोणतेही चूकीचे पाऊले उचलण्याची परवानगी मुळीच नाही. कारण तिच्या अशा वर्तनामुळे समाजात शांतता नांदण्याऐवजी उपद्रव व अराजकता निर्माण होण्याचा धोका असतो. अनेकदा असे घडले की काहीं मुलींनी पवित्र पैगंबर (स.) च्या सेवेत हजर होऊन सांगितले की आमच्या वडीलाने आमचं नातं अमुक-अमुक ठिकाणी जोडलं आहे आणि मग सर्व परिस्थिती ऐकल्यानंतर हुजूर (स.) नी मुलींच्या बाजूने निर्णय दिला. या संदर्भात एक प्रसिद्ध प्रसंग असा नमूद आहे की, एकदा एक मुलगी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत हजर झाली आणि म्हणाली की आम्हां स्त्रियांना लग्नासंदर्भात अधिकार नाही का? ते (स.) म्हणाले अधिकार आहे. तेव्हा ती म्हणाली की, माझ्या वडिलाने एका वृद्ध व्यक्तीशी माझं लग्न जोडलंय आहे किंवा जोडणार आहे. यावर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, याबद्दल निर्णय घेण्याची तुला परवानगी आहे. ती मुलगी म्हणाली, हे पवित्र पैगंबर, मी माझ्या वडिलाच्या विरूद्ध जाणार नाही तर मी फक्त स्त्रीचे हक्क आणि अधिकार काय आहेत हे जाणण्याकरिता आपणास हे प्रश्न विचारले होते. माझ्या वडिलाने

जिथे कोठे माझं नातं जोडलेलं आहे तिथे मी खुशीने लग्न करेन, कारण मी माझ्या वडीलाशी खूप प्रेम करते. हे लग्न मलाही मान्य आहे, पण महिलांचे हक्क प्रस्थापित झाले पाहिजे, यासाठी मी उपस्थित झाले होते.

पुढे एक प्रसंग असा नमूद आहे जिथे पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुलीच्या वडिलांनी ठरवलेले स्थळ मोडले (जे मुलीच्या इच्छेविरुद्ध होते). तर हजरत अब्दुल्ला बिन अब्बास सांगतात की, एका महिलेचा नवरा मरण पावला. त्यापासून तिला एक मुलगाही झाला होता. मुलाच्या काकांनी विधवेच्या वडिलाकडे विधवेशी लग्न करण्याची इच्छा प्रस्तूत केली, यावर महिलेनेही संमती दर्शवली. मात्र मुलीच्या वडिलाने तिच्या संमतीच्या विरूद्ध जाऊन तिचे संबंध दुसऱ्या ठिकाणी जोडले. यावर मुलगी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) च्या सेवेत न्याय मागण्यास हजर झाली. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिच्या वडिलाला विचारले. तिचे वडील म्हणाले, मी तिचे नातं तिच्या दीर पेक्षा चांगल्या माणसाशी केले आहे. तद्पश्चात पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी वडिलाने केलेले संबंध मोडून त्याविधवाच्या दीरशी लग्न करून दिले.

(मसनदुल इमामुलआज़म, किताबबुन्निकाह)

आता इथे पहा, विधवेचा हक्क सर्वोतोपरी होता आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रीची (मुलीची) इच्छाही पाहावी लागणार होती. पण अहमदिया मुस्लिम जमाअत मध्ये संबंध जोडताना हे पाहणे अतिशय आवश्यक आहे की मुलगी ज्या मुलाशी लग्न करणार आहे किंवा करू इच्छित आहे तो अहमदी असावा. कारण या सर्व गोष्टींचा उद्देश शुद्ध समाजाची स्थापना, सदाचाराची स्थापना आणि सुस्वभावी अपत्यांचीप्राप्ती आहे. जर अहमदी मुलांनी अहमदी मुलींखेरीज अन्य कोठे लग्न केले आणि अहमदी मुलींनी

अहमदी मुलांव्यतिरिक्त लग्न केले तर समाजात, घराण्यात अशांतता निर्माण होण्याची शक्यता असेल. आणि परिणामस्वरूप नवीन पिढी धर्मापासून परावृत्त होण्याचा धोका नेहमी राहील. त्यामुळे भौतिकघटकांप्रमाणेच धार्मिकघटकांची समानता पाहणेही आवश्यक आहे. आमच्यामधील काहीं मुले-मुलीं जमाअतबाहेर लग्न करण्याची इच्छा बाळगून आहेत आहेत. यासंबंधात अशा मुलांकडे लक्ष देणे फार आवश्यक झाले आहे. विशेषकरून या स्वातंत्र्य समाजामध्ये नांदत असलेल्या नवपिढीकडे. आणि म्हणून आता व्यवस्थापकांची जबाबदारी आणखीन वाढली आहे; कारण अशा स्वरूपाची तक्रार आजकाल वाढत चालली आहे आणि अनेक मुले-मुली स्वच्छेने, आणि कायदांची तमा न बाळगता इतर पंथ वा धर्मातील लोकांशी लग्न करत आहेत.

हजरत अबू हातीम सांगतात की, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असे सांगितले की, ''जर एखादी व्यक्ती, जी सदाचारी आणि नैतिक आहे, तुमच्याकडे लग्नाचा प्रस्ताव घेऊन आली तर त्याचा प्रस्ताव कबूल करा आणि कधीही अशा व्यक्तिला नकारात्मक उत्तर देऊ नका अन्यथा पृथ्वीतलावर उपद्रव आणि अराजकता निर्माण होईल.'' हे वाक्य पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तीनदा लोकांसमोर आवर्जून सांगितले.

(तिरमिधी किताबबुन्निकाह)

तर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी गरीब मुलाशी संबंध जोडा असा उपदेश केला. जरी आर्थिक दुर्बलता असली तरी, अल्लाहचे वचनानुसार, परमेश्वर अशा निर्धनाची परिस्थिती सुधारेल. त्यामुळे मुलींचे स्थळ पाहताना जास्त टाळाटाळ करता कामा नये, जर त्या व्यक्तिच्या नैतिकतेवर तुम्हाला संतुष्टी असेल तर संबंध जोडण्यात वेळ वाया खर्च

करू नका. तसेच, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांचा मुलांसाठी असा आदेश आहे की, मुलीचे बाह्य सौंदर्य आणि रूप न पाहता आणि तिची आर्थिक परिस्थिती व ऐपत न बघता तिची नैतिकता आणि धर्मपरायणतेला प्राधान्य द्या.

याविषयी हजरत अबू हुरैरा सांगतात की पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) असे म्हणाले की, ''स्त्रीशी लग्न करण्यासाठी फक्त चार कारणे असू शकतात, एकतर तिच्या संपत्तीमुळे किंवा तिच्या वंशामुळे किंवा तिच्या सौंदर्यामुळे किंवा तिच्या नैतिकतेमुळे; तर तु नैतिकतेला प्राधान्य दे. अल्लाह तुला खुशाल ठेवो आणि तुला सदाचारी पत्नी लाभो.

(बुखारी किताबबुन्निकाह, बाबुल इक्फा फिद्दीन)

म्हणून याकडे लक्ष वेधून पुढील पिढीचे ध्यान धार्मिकतेकडे वळवून, त्यांच्या घरातील वातावरण शांततेचे निर्माण करणे, हे या मागील अस्सल हेतू. कारण आई जर धार्मिक आणि सद्‌गुणी असेल तर अपत्यही सद्‌गुणी बनतात. आणि पालकांना संतुष्टी प्राप्त होण्यासाठी सद्गुणी आणि चांगल्या मुलांपेक्षा दुसरे कोणतेच साधन नाही. एका श्रद्धावंतासाठी, समाजात आदराचे कारण केवळ एक चांगली आणि नम्र अपत्य होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक अहमदीने याकडे लक्ष दिले पाहिजे. मुली उदार, शालीन, हुशार, सुशिक्षित, जमाअतच्या कार्यात सक्रिय इत्यादी वैशिष्टे पाहून देखील ती सुंदर नाही किंवा तिची उंची कमी आहे; अशा अनेक तक्रारी मजपर्यंत पुष्कळ प्रमाणावर पोहोचल्या आहेत. फोटो आणि लोकांकडून माहिती प्राप्तकरूनही सौंदर्य आणि उंची ओळखता येते, हे मी यापूर्वीही एकदा निदर्शनास आणून दिले आहे. मग घरी जाऊन मुलींना पाहणे आणि त्यांना त्रास देण्याची काय गरज आहे. या कारणामुळेच

परमेश्वराने असे निर्देश केले आहे की या भौतिक प्रपचांमध्ये न पडता, धार्मिक निकषावर संबंध जोडा. म्हणूनच पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असे म्हटले आहे की, जर तुम्हाला तुमच्या संतती सांभाळायच्या असतील तर नैतिकता पहा. जर तुम्ही मुलींची धार्मिक पैलू पाहून संबंध जोडत असाल; तर तुम्ही पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रार्थनेचे वारस व्हाल आणि तुमची संतती देखील धार्मिकतेवर चालताना तुम्ही पाहसाल.''

काही लोक स्थळाच्या वेळी मुलींकडे कुर्बानीच्या बकऱ्याला हाताळल्या सारखे हाताळतात. विवाह हा एक प्रकारचा करार आहे. हे एका पक्षाच्या त्यागाचे नाव नाही, तर दोन्ही पक्षांचे परस्पर त्यागाचे नाव आहे, हे असे बंधन आहे.

हजरत अब्दुल्ला बिन अमर (र.ज.) सांगतात की, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) एक ठिकाणी म्हणाले, ''जग हे उदरनिर्वाहाचे साधन आहे आणि सद्गुणी स्त्रीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेच साधन नाही.''

(इब्ने माजा अब्वाबुन्निकाह, बाब अफझलुन्निसा)

त्यामुळे जे जगाच्या निकषावर प्रत्येक गोष्टीचे मोजमाप करतात, त्यांनी ही हदीसही त्यांच्यासमोर ठेवावी की, तुमच्यासाठी सद्गुणी स्त्रीशिवाय दुसरे कोणतेही सांसारिक जीवनाचे साधन नाही. एक सद्गुणी स्त्री तुमचे घरही सांभाळेल आणि तुमच्या मुलांना उच्च प्रशिक्षणही देईल. परिणामी तुम्ही धार्मिक व भौतिक प्रसादाचे धारक व्हाल.

परत एक कथन असे आहे की, हजरत आयशा (र.जी.) कडून असे वर्णन केले जाते की पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले: ''सदाचार पुरुष आणि सदाचारिणी स्त्रियांचे संबंध जोडा.''

(सुनन अद्‌दार्मी, किताबुन्निकाह, बाब फिन्निकाह अस्सालिहीन)

तर यातही चांगल्या मुला-मुलींच्या लग्नाचे संकेत आहे. आणि हे कार्य समाजाला बिघडण्यापासून वाचवण्याचे साधन आहे, त्यामुळे ते लवकर करणे आवश्यक आहे. पण आजकाल असे लोक मोठ्या प्रमाणात असल्याचे मी अनेकदा पाहिले आहे. मुलं आई-वडिलांसोबत येतात, ३४-३५ वर्षांचे असतात, तरी त्यांना लहान बाळाप्रमाणे स्वतःशी कोंडून ठेवलेले आहेत आणि आतापर्यंत त्यांचे लग्न झालेले नाही.आणि विवाह करण्याकडे त्यांचा मुळीच लक्ष नाही.

काहीं असे लोक आहेत जे मुलींची कमाई खाण्यासाठी हे करत आहेत, काहीजण मुलांची कमाई खाण्यासाठी हे करत आहेत. आणि जे मुलींची कमाई खाणार आहेत ते फक्त घरातील मुले रिकामटेकडे आहेत, अशिक्षित आहेत, म्हणून असे करत आहेत. परिणामस्वरूप मुलींच्या पगारावर घर चालते आणि लग्न झाले तरी जावई आमच्या घरातच राहावे, असा प्रयत्न केला जातो, जे बहुतांशी अशक्य असतो. परिणामस्वरुप संघर्ष निर्माण होतो. म्हणून लग्न झाल्यानंतर जर पती-पत्नीला वेगळे राहायचे असेल आणि त्यांच्यात क्षमता असेल आणि आई-वडील वयाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचले नसतील, जिथे त्यांना कोणाचीतरी मदत हवी असेल आणि दुसरे कोणीही नसेल, तर अशा परिस्थितीत त्याग करावा लागतो. खरे पाहता ही तर त्या घरातील मुलाची जबाबदारी आहे. जर कोणाला मुलगा नसेल तर त्या मुलीची मजबुरी आहे. पण साधारणपणे जेव्हा मुलगी लग्न करून दुसऱ्या घरी जाते तेव्हा तिला तिचे संसार व्यवस्थापित करायला द्यायला हवे. आणि याविषयी जमाअतच्या व्यवस्थापनाबरोबर आमच्या तिन्ही साहाय्यक

संघटनांनी (लजना, खुद्दाम, अन्सार) त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांनीही आपापल्या परीने समजावून सांगणे आवश्यक आहे. आणि प्रौढ व महिला संघटनेतील सदस्यांनी पालकांना आणि मुलींना समजावून सांगावे तर युवक संघटने ने मुलांनासमजावावे.

पुढे एक कथन आहे की, हजरत मुगैराह (र.ज.) सांगतात की त्यांनी एका ठिकाणी लग्न करण्याचा प्रस्ताव दिला, तेव्हा पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले की, ''त्या मुलीला एकदा बघून तरी ये; कारण अशाप्रकारे तुम्हां दोघांमध्ये प्रेम निर्माण होण्याची जास्त शक्यता आहे.''

(तिरमिधी किताबबुन्निकाह, बाब फिन्नझारे इल मख्तुबा)

या परवानगीचा सुद्धा आजच्या समाजातील काही लोकांनी गैरसमज करून घेतला आहे आणि याचा उलट अर्थ आत्मसात करून लोकांपासून विलग होवून तासंतास बसणे, बाहेर फिरायला जाणे, दुसऱ्या शहराला जाणे, फोनवर तासंतास बोलणे इत्यादी गैरवर्तनेला अंगीकार केलं आहे. पण मी या ठिकाणी हे स्पष्ट करू इच्छितो की हे सर्व चूकीचे आणि गैर इस्लामिक मार्गे आहेत. म्हणजे समोरासमोर येऊन, चेहरा पाहून एकमेकांना समजून घेणे सोपे जाते. काही गोष्टी संभाषण झाल्यावर कळतात. तसेच आजच्या काळात घरच्यांसोबत बसून जेवण्यात काहीच आक्षेपार्ह नाही. जेवणातूनही एकमेकांच्या अनेक गोष्टी आणि सवयी समोर येतात. आणि एखादी गोष्ट आवडली नाही असे वाटत असेल तर आधीच त्याला शोधून पुढील होणाऱ्या तंट्यांपासून सुरक्षित होण्याचे नियोजन केले जाऊ शकते. आणि जर काहीं चांगल्या गोष्टी असतील तर त्याच्याद्वारे परस्परात प्रेम आणि आपुलकी मध्ये वाढ होण्याचे कारण बनते. अनेक वेळा समाजामधील काहीं लोकांची सवय असते की एखाद्याचे नाते जुडत

असेल तर ते तोडण्याचा प्रयत्न करतात. पण मुलगा-मुलगी समोरासमोर भेटून, एकमेकांची सवयी पाहिल्यानंतर, त्यांना ही संधी मिळत नाही. म्हणून लग्नाआधी एकमेकाला पाहणे आणि सवयीं जाणून घेणे फायदेचे ठरते. पण काही लोक या उलट टोकाच्या दिशेने गेलेले आहेत, लग्नाआधी किंवा लग्नाच्या प्रस्तावाच्या वेळी मुला-मुलींचे एकमेकांसमोर बसणे हे त्यांना सहन होत नाही, याला स्वाभिमानाचे नाव दिले जाते. हे पण लक्षात ठेवा की इस्लामची शिकवण माफक आणि तटस्थ प्रमाणाची शिकवण आहे. ना जास्त ना कमी. आणि त्यानुसार त्याचे पालन केले पाहिजे, जेणे करून समाजात शांतता राहील आणि समाजातील उपद्रवी घटक दूर होतील.

यानंतर एक कथन आहे की, हजरत मक्कल बिन यासर (र.ज.) सांगतात की पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले की, ''तुम्ही अशा स्त्रियांशी विवाह करा ज्यांना प्रेम कसे करावे हे माहित असेल आणि ज्यांच्यापासून अधिक मुले उत्पन्न होऊ शकतात; जेणेकरून माझ्यापूर्वी होऊन गेलेल्या धर्मांच्या अनुयायींच्या संख्येबाबतीत माझ्या समुदायाच्या संख्येवर मला अभिमान असेल.''

(अबू दाऊद, किताबुन्निकाह, बाब तजाविजुल अबकर)

तर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जास्त मुले असलेल्या महिलेला तिच्या या वैशिष्ट्याबद्दल एक स्थान दिले आहे. कारण हे माझ्या (पवित्र पैगंबर मुहम्मद स.) समुदायाच्या प्रगतीचे एक कारण असू शकते. येथे पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) चा हेतू फक्त संख्या वाढविणे नव्हे तर अशा मुलांची संख्या वाढवणे आहे, जी नैतिकतेवर आणि धार्मिक तत्त्वांवर चालणारी आणि परमेश्वराची उपासना करणारी असावी.

आणि त्यांचे हेच आचरण पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) च्या अभिमानाचे कारण ठरतील. त्यामुळे महिलांवर ही जबाबदारीही टाकण्यात आली आहे की, त्यांनी केवळ अपत्यांचा अभिमान बाळगू नये, तर अपत्यांना सदाचरणावर मार्गस्थ करण्याचा प्रयत्न करावा. जेणेकरून पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनाही अभिमान होईल आणि अशा मुलांच्या आईंना देखील त्यांच्या सद्‌गुणांचा अभिमान होईल.

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) स्वतः त्यांच्या सोबतींना विवाहाचे सल्ले देत असत, त्यांना वारंवार आठवण करून देत असत आणि अनेकदा त्यांच्या लग्न व्यस्थेमध्ये रुची घेत असे. असाच एक प्रसंग हजरत रबिया अस्लामी (र.ज.) सांगतात, ज्याचा सारांश असा आहे की (हजरत रबिया) पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांची सेवा करत असत. एकदा पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) रबियाला विचारले, लग्न करणार नाहीस? ते म्हणाले नाही, मग काही वेळाने पुन्हा विचारले, तू लग्न करणार नाहीस का? रबिया म्हणाले नाही. रबियाने स्वतः विचार केलं की माझ्यासाठी चिंता करणारे तर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) आहेत. चांगलं काय आणि वाईट काय हे त्यांना माहित आहे. आता जर त्यांनी मला विचारले तर मी हो म्हणेन. जेव्हा पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिसऱ्यांदा विचारले तेव्हा त्यांनी होय असे उत्तर दिले. यावर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, अनसारांच्या अमुक अमुक घराण्याकडे जा आणि त्यांना माझा संदेश दे, की तुम्ही अमुक अमुक मुलीशी माझा (रबियाचा) लग्न करा. त्यांनी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) चा संदेश स्वीकारला आणि त्या मुलीशी लग्न केले. यावर पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी वलीमा ची सर्व व्यवस्था स्वत: केली आणि स्वतःही वलीमा मध्ये सामील होऊन

खूप प्रार्थनाही केली.

(मसनद अहमद बिन हंबल, मस्नादुल मदिनैन)

हजरत इब्न अब्बास (र.ज.) इस्लामच्या आधी असलेली एका प्रथेचे उल्लेख करत सांगतात की, इस्लामपूर्व अशी प्रथा होती की जेव्हा एखाद्या पुरुषाकडे एखादी अनाथ मुलगी असायची तेव्हा तो तिच्यावर कपडा टाकायचा. तो कपडा टाकल्यावर त्या मुलीशी लग्न करण्याची कोणाचीही हिंमत नसायची. जर ती सुंदर आणि श्रीमंत असली तर त्या पुरूषाने स्वतः तिच्याशी लग्न करायचा आणि तिची संपत्ती हिसकावून घ्यायचा आणि जर ती दिसायला जास्त सुंदर आणि श्रीमंत नसली तर ती व्यक्ती, तिला मरेपर्यंत आपल्याजवळ ठेवायचा. आणि तिच्यानंतर तिच्या संपत्तीचा मालक व्हायचा.

अरबस्तानातील या दुर्दैवी परिस्थितीमुळे अल्लाहने विधवा आणि अनाथांच्या विवाहाकडे आमचे लक्ष वेधले. आणि पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सुद्धा आपल्या सोबतींच्या विवाह सोहळ्यात विशेष रस घेतला आणि या आदेशाचे पालन केले आणि पौगंडावस्थेला पोहोचल्यावर स्त्री-पुरुषांनी विवाह करावा असा सल्ला दिला. विधवा स्त्रीया जर अल्पवयीन असतील किंवा लग्नासाठी इच्छुक असतील तर त्यांचे लग्न करा. आणि केवळ वैयक्तिक ऐहिक फायद्यासाठी मुलींना घरात ठेवू नका. तसेच मुलांच्या लग्नात उशीर करू नका. त्यामुळे विवाहयोग्य व्यक्तींचे लग्न लावण्याकडे लक्ष देण्याची जबाबदारी आता संपूर्ण समाजाची झाली आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी या काळात पवित्र कुरआन आणि पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) च्या आदेशांचे पालन करण्याचे प्रयत्न

केले आहे. आणि विशेषत: त्यांनी प्रयत्न केले की अहमदी मुली आणि मुलांचे नाते जमाअतमध्येच जुडले पाहिजे जेणेकरुन येणाऱ्या पिढ्या धर्मपासून चिटकून राहतील. जमाअतमध्ये लग्न करण्याबाबत हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी आम्हाला खूप उपदेश केलेत. जे लोक बिगर अहमदींशी लग्न करतात किंवा करू पाहतात त्यांच्यासाठी त्यांनी स्पष्ट शब्दात उपदेश केले आहे.

हजरत अपेक्षित (अ.स.) सांगतात की ''सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने आणि त्याच्या आदरणीय आर्शीवादामुळे, आमच्या संस्थानाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि आता त्याची संख्या हजारोंपर्यंत पोहोचली आहे आणि लवकरच अल्लाहच्या कृपेने लाखोंपर्यंत पोहोचेल.'' आज अल्लाहच्या कृपेने ही संख्या कोटींपर्यंत पोहोचली आहे. म्हणून त्यांच्यातील परस्पर ऐक्य सबळ करण्यासाठी आणि बिगर जमाअती नातलागांच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी मुलां-मुलींच्या विवाहाबाबत उत्तम नियोजन करणे अत्यावश्यक आहे. ही बाब तर स्पष्ट आहे की, ते लोक जे आमच्या विरोधी आणि तथा-कथित मौलवींच्या चूकीच्या धारणेचे अधीन राहून आमच्याशी द्वेष, मत्सर आणि वैरभावना मनात घेऊन बसले आहेत; अशा लोकांशी नवीन नातेसंबंध, जोपर्यंत ते पश्चात्ताप करून या जमातमध्ये सामील होत नाहीत तोपर्यंत स्थापित होणे अशक्य आहे. आणि आज अहमदिया मुस्लिम जमाअत इतक्या प्रमाणावर वाढली आहे की आता बिगर अहमदींची आवश्यकतादेखील भासत नाही. आज प्रत्येक पातळीवर मग ते धनच्या बाबतीत असो की साधन-संपत्ती मध्ये किंवा ज्ञानामध्ये, श्रेष्ठतेमध्ये, कुटूंबामध्ये, परायणतेमध्ये आणि सदाचरणाचे जीवन जगणाऱ्या लोकांमध्ये इतरांपेक्षा

विपुल प्रमाणावर सदस्य आहेत आणि प्रत्येक समाजाचे आणि वंशाचे लोक या जमातमध्ये पहायला मिळतील. त्यामुळे या स्तरावर आम्हाला अशा लोकांशी संबंध ठेवणे दुरुस्त वाटत नाही जे आम्हाला काफिर म्हणतात आणि आमचे नाव दज्जाल ठेवतात किंवा ते स्वतः म्हणत नसतील परंतु असे म्हणणाऱ्या लोकांचे प्रशंसक आणि अनुयायी आहेत. म्हणजे, ते स्वतः बोलत नाहीत, तर असे बोलणाऱ्यांची स्तुती करतात. म्हणून लक्षात ठेवा की जो माणूस अशा लोकांना सोडू शकत नाही तो आमच्यात सामील होण्यास योग्य नाही. जोपर्यंत परायणता आणि सत्य प्राप्तीसाठी एक भाऊ दुसऱ्या भावाला सोडत नाही आणि वडील आपल्या मुलापासून विलग होत नाहीत तोपर्यंत तो आमच्यातील नाही. म्हणून हे माझ्या अनुयायींनो! ध्यान देऊन ऐका की, सदाचरणाच्या प्राप्तीसाठी या अटींचे अनुकरण आवश्यक आहे. म्हणून मी अशी व्यवस्था केली आहे की यापुढे तमाम युवक आणि युवतीं अहमदींची नावे आणि इतर माहिती एका पुस्तकात जमा करून ते गुप्तपणे माझ्याकडे जमा असेल. जर एखाद्या मुलीच्या आई-वडिलांना त्यांच्या कुटुंबात उचित वर मिळत नसेल, जो जमाअत मधील व धार्मिक आणि त्यांच्या समाधानानुसार नसेल, किंवा अशीच परिस्थिती मुलाच्या पालकांसमोरही उपस्थित झाली तर अशा सर्व परिस्थितीत त्यांनी आम्हाला उचित वर-वधु शोधण्याची परवानगी द्यावी जेणे करून इतर क्षेत्रातील जमाअतच्या मुलां-मुलींपैकी उत्तम स्थळ आम्ही त्यांना शोधून देऊ. आणि पालकांनी आम्हांवर विश्वास ठेवावा की आम्ही देखील परिपूर्ण काळजी घेऊन त्यांना उचित स्थळ प्रदान करु आणि आमची सर्वप्रथम प्रार्थमिकता हीच असेल की त्यांच्याच घराण्यातील किंवा क्षेत्रातील असावा किंवा अशा राष्ट्रातील असावा ज्यांचे

सहसा आपापसात नाते असावे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मुलगा किंवा मुलगी चांगले, चारित्र्यवान आणि सक्षम असावे आणि धार्मिकतेशी सलग्न असण्याचे संकेत दिसले पाहिजेत, याची काळजी घेतली जाईल. हे पुस्तक गोपनीय ठेवण्यात येईल आणि परिस्थितीनुसार वेळोवेळी माहिती दिली जाईल आणि कोणत्याही मुला किंवा मुलीची क्षमता आणि चारित्र्य सिद्ध केल्याशिवाय त्याच्याबद्दल कोणतेही मत व्यक्त केले जाणार नाहीत. काही लोक सहज विचारतात, की कोणी आहे तर सांगा (विवाहयोग्य वर-वधू)? म्हणून आमच्या सदस्यांनी त्यांच्या मुलांची नावे, वय आणि कुटूंबाची यादी पाठवणे बंधनकारक आहे जेणेकरून ते पुस्तकात जमा केली जाईल.

(मजमुआ इश्तिहारात, खंड तिसरा, पृष्ठ ५०,५१)

ही हजरत अपेक्षित मसीह (अ. स.) यांची घोषणा होती. या अंतर्गत आता मुख्यालयामध्येही रिश्ता-नाता च्या नावाखाली एक विभाग स्थापित करण्यात आला आहे आणि संपूर्ण जगातही याचे उपविभाग कार्यरत आहेत. काही लोक वयैक्तिकपणे या कार्यात रस घेतात तर अशा लोकांना जमाअत अधिकृतपणे ही जबाबदारी देते. आणि अल्लाहच्या कृपेने, या विभागाच्या प्रयत्नाने लग्नही होतात, तरी यामार्गात अनेक अडचणी अजून उपस्थित आहेत. अल्लाह त्यांनाही दूर करो, पण यामध्ये अशा लोकांसाठी समाधानकारक उत्तर आहेत जे म्हणतात की, आम्हाला जमाअत बाहेर लग्न करण्याची परवानगी मिळाली पाहिजे. असे लोक जरी आम्हाला काफिर म्हणत नाहीत किंवा फतवा लावत नाहीत, पण त्यांच्यासोबत बसतात, त्यांचा समर्थन करतात, त्यांच्या भीतीपोटी विरोध करत नाही, त्यांच्या मशिदीत जाऊन त्यांचे प्रवचन ऐकतात, तर असे

लोक त्यांच्यापैकीच गणले जाईल आणि अशा लोकांशी संबंध जोडणे उचित नाही. मी म्हटल्याप्रमाणे, प्रत्येक जमाअतमध्ये आमचा हा विभाग प्रस्थापित आहे त्यांच्याबाबत अशी तक्रार केली जाते की हे असून सुद्धा मुलींना स्थळे मिळत नाही. यात एक मोठी अडचण अशी आहे की पालक मुलींची माहिती तर पाठवतात पण मुलांची मात्र पाठवत नाहीत. जर मुलांचीही यादी पाठवण्यात आली तर नातं जोडण्यात सोयीस्कर राहील. सर्वसाधारणपणे मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त असते. जमाअतला प्राप्त झालेल्या यादी अनुसार ७-८ मुलींची माहिती (बायोडाटा) च्या विरूद्ध फक्त एका मुलाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असते. परिणामस्वरुप नातेसंबंध जुळवण्यात खूप अडचणे उद्‌भवतात. दोन्ही बाजूंनी पूर्ण माहिती उपलब्ध केल्यावर स्थळे शोधणे सोपे जातात. साधारणपणे मुलांचे नाते अनेकवेळा त्यांचे आई-वडील स्वत:च लावण्याचा प्रयत्न करतात; असे न करता पालकांनी मुलांचे नाव देखील त्यांच्या सर्व माहिती सोबत मुख्यालयात पाठवणे गरजेचे आहे, तेव्हाच मुलींचे नाते परस्परात जुडू शकतात. त्यामुळे पालकांव्यतिरिक्त मुलांनीही याकडे लक्ष दिले पाहिजे की, मुलींचे नाते जमाअतमध्येच जुळवण्याचा प्रयत्न करावा आणि जर ते आपल्या नातेवाईकांमध्ये सापडले नाहीत तर जमाअती व्यवस्थापनाच्या अंतर्गत शोधण्याचा प्रयत्न करावा. आणि काही लोक कुळ, जात, रंग-रुप, सौंदर्य इत्यादींच्या अडचणीत अडकून आहेत. मी आधी सांगितले आहे की, जर अशाप्रकारे तुम्ही या समस्यांमध्ये अडकत असाल तर मुलींचे नाते ठरवणे कठीण होऊन जाईल. त्यामुळे या ऐहिक लोभापासून परावृत्त होऊन धार्मिकता आणि नैतिकतेला प्राधान्य देणे सर्वांसाठी अत्यावश्यक आहे.

या संदर्भात हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, ''जगामध्ये आपण पाहत असलेली जाती परंपरा ही प्रतिष्ठेसाठी नव्हे तर फक्त ओळख पटवून देण्यासाठी परमेश्वराने निर्माण केली आहे आणि आजकाल चार पिढ्यांनंतर वंश-कूळ शोधणे देखील कठीण झाले आहे. जातीय संघर्षात अडकणे हे एका श्रद्धावंताची शान नाही. जेव्हा परमेश्वराने स्पष्टपणे सांगितले आहे की, माझ्या समीप जात-वंश व्यर्थ आहे; तर खरा सन्मान आणि मोठेपणाचे कारण फक्त सदाचारण आहे, म्हणून या गोष्टींच्या भानगडात पडणे निरर्थक आहे.

सर्वशक्तिमान अल्लाह आम्हा सर्वांना सदाचरणाचे पालन करून नातेसंबंध स्थापित करण्याचे सामर्थ्य देवो. मुलांचे तसेच अनाथ आणि विधवांचे, पवित्र कुरआनच्या आदेशानुसार, नातं जोडण्याचं सामर्थ्य प्रदान करो; मग ते जमाअतच्या व्यवस्थापनेद्वारे होवो की समाजाद्वारे. आणि ज्या मुलींच्या आई-वडिल दुःखी आणि निराश आहेत अल्लाह अशा सर्व पालकांचे दुःख आणि नैराश्य दूर करो. आमीन.

**लग्नांमध्ये उधळपट्टी, देखावा, प्रतिष्ठा आणि पैशाची अभिव्यक्ती असू नये. काही लोक या विधींमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त पडू लागले आहेत. आता मी स्पष्टपणे सांगत आहे की या निरर्थक विधींचे पालन करू नका आणि यांना बंद करा.**

खुतबा (प्रवचन) हजरत मिर्ज़ा मसरुर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा, (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १५ जानेवारी, २०१०, (१५ सुलह १३८९ हिजरी शम्सी), स्थान मशिद बैतुल फुतूह, लंडन, ब्रिटेन

أَشْهَدُ أَنْ لَّآ إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا
عَبْدُهٗ وَ رَسُوْلُهٗ۔ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ
اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ اَلرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ
يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَ اِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ
الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ
عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔
فَاٰمِنُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ وَالنُّوْرِ الَّذِيْٓ اَنْزَلْنَا۔ وَاللّٰهُ بِمَا
تَعْمَلُوْنَ خَبِيْرٌ (अत् तगाबुन - ९)

परमेश्वराचा मनुष्यांवर एक मोठा उपकार आहे की त्याने मनुष्याला अशरफ-उल-मखलकू (सर्वोत्तम निर्मीती) करुन बुद्धी प्रदान केली आहे, ज्याद्वारे तो इतर निर्मितींवर आणि निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्त्व गाजवून आहे आणि प्रत्येक उगवता दिवस मानवी क्षमतेद्वारे अस्तित्वात येणाऱ्या नव नवीन शोध जगासमोर उमटत आहे. आजची सांसारिक प्रगती दहा वर्षांपूर्वी नव्हती आणि आजपासून दहा वर्षांपूर्वीची सांसारिक प्रगती वीस वर्षांपूर्वी नव्हती. याचप्रकारे, जर आपण मागे पाहत राहिलो तर आजच्या नवीन शोधांचे महत्त्व आणि मानवी बुद्धीक्षमतेचा अंदाज होत राहील. पण ही प्रगती जी मनुष्याने भौतिक स्वरूपात केलेली आहे, हा त्याच्या जीवनाचा उद्देश आहे का? प्रत्येक काळातल्या मनुष्याने हे समजून घेतले आहे की, माझी ही प्रगती आणि माझी शक्ती, ही संपत्ती, माझी ऐहिक आकांक्षा, संपत्तीच्या दृष्टीने दुसऱ्यावर प्रभुत्त्व, माझे श्रेष्ठत्व, संपत्तीला भौतिक समाधानाचे माध्यम बनवणे, स्वतःच्या सामर्थ्याने इतरांना वश करणे

हाच जीवनाचा उद्देश समजला गेला आहे; किंवा एक सामान्य माणूस जो भौतिकविलीन व्यक्ती आहे, ज्याच्याकडे संपत्ती नाही, तो देखील वरील घटकांना दुरुस्त समजतो किंबहुना आजचे तरुण, ज्यांना धर्मात रस नाही आणि जे जगाकडे झुकलेले आहेत, ते समजतात की ह्या नवीन शोध, टीव्ही, इंटरनेट, या गोष्टी प्रत्यक्षात आपल्या प्रगतीचे मारक आहेत आणि अनेकजण यापासून प्रभावितही होत आहेत. पण लक्षात ठेवा ही अत्यंत चूकीची कल्पना आहे; कारण या कल्पनेने मोठ मोठ्या भ्रष्ट, धूर्त आणि अत्याचारी व्यक्तिंना जन्म दिले आहे. या विचाराने अनेक विलासी आणि विषयांध व्यक्तिंना घडवले आहे. या विचाराने अनेक फिरऔन निर्माण केले आहे, जे स्वतःला धनी आणि वैभवसंपन्न समजून होते. परंतु या कल्पनेला सर्वशक्तिमान अल्लाहने जो रब्बुल अलामीन (जगाचा विधाता) आहे, जो निर्माता आहे, त्याने जोरदारपणे नाकारला आहे. तो स्पष्टपणे असे सांगतो की, ज्या गोष्टी तुम्ही तुमच्या जीवनाचा उद्देश मानता ते तुमच्या जीवनाचे उद्देश नाही. या सांसारिक भौतिक गोष्टींचा लाभ उचला आणि जगापासून निरोप घ्या. अल्लाह पवित्र कुरआन मध्ये असे फरमावितो,

وَ مَا خَلَقْتُ الْجِنَّ وَ الْاِنْسَ اِلَّا لِيَعْبُدُوْنِ

अर्थात मी जिन्न आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केलेले आहे की त्यांनी माझी उपासना करावी. (अज् ज़ारियात ५७)

या संदर्भात हजरत अपेक्षित मसीह व महदी सांगतात की: ''मनुष्याच्या जन्माचा खरा उद्देश हा आहे की त्याने आपल्या विधात्याला ओळखावे आणि त्याला शरण जावे जसे की त्याने फरमाविले आहे,

وَ مَا خَلَقْتُ الْجِنَّ وَ الْاِنْسَ اِلَّا لِيَعْبُدُوْنِ

अर्थात मी जिन्न आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केलेले आहे की

त्यांनी माझी उपासना करावी; पण दुर्दैवी परिस्थिती अशी की बहुसंख्य लोक जगात आल्यानंतर आणि मग तरुण झाल्यावर आपले ध्येय आणि उद्देशांना विसरुन आणि परमेश्वराच्या मार्गाला सोडून ऐहिक विलासाकडे आकर्षित होऊन आहेत आणि भौतिक साधन-संपत्तीमध्ये विलीन असल्यामुळे परमेश्वराचे अस्तित्व त्यांच्यात नाममात्र बाकी राहिले आहे तर काहींमध्ये तो देखील पहायला मिळत नाही. ते जगातच मग्न आणि तल्लीन होऊन आहेत. परमेश्वर आहे तरी काय याची त्यांना खबर सुद्धा नाही.''

(मल्फ़ूज़ात खंड -४, पृ. १३४ नवीन आवृत्ती.)

जन्माचा हेतू कसा जाणून घ्यायचा आणि परमेश्वराची उपासना कशा प्रकार करावी याकरिता सर्वशक्तिमान अल्लाह जगात संदेष्टे पाठवत असतो, जे त्याच्या क्षेत्रामधील लोकांना धर्माची शिकवण आणि जन्माचा उद्देश साध्य करण्यास मदत करतात. आणि पुढे जेव्हा मनुष्य सर्व प्रकारचे संदेश समजून घेण्यास सक्षम झाला आणि तो भौतिक प्रगतीच्या मार्गांवर अग्रसर झाला तसेच परस्पर संवाद आणि परस्पर वागणुकीत प्रगती होऊ लागली, तेव्हा परमेश्वराने सर्वोत्तम आणि श्रेष्ठतम प्रेषित मुहम्मद (स.) यांना पाठवले, ज्यांनी परमेश्वराच्या आदेशानुरुप ही घोषणा केली,

اَلْيَوْمَ اَكْمَلْتُ لَكُمْ دِيْنَكُمْ وَ اَتْمَمْتُ عَلَيْكُمْ نِعْمَتِىْ وَ رَضِيْتُ
لَكُمُ الْاِسْلَامَ دِيْنًا

अर्थात-आज मी तुमच्या भल्यासाठी तुमचा धर्म परिपूर्ण केलेला आहे आणि तुमच्यावर माझा अनुग्रह पूर्ण केला आहे आणि तुमच्यासाठी धर्म म्हणून इस्लामची निवड केली आहे (अल् माईदाः ४); आणि या पवित्र कुरआनमध्ये, परमेश्वराचे सान्निध्य प्राप्त करण्याचे साधन, आणि उपासनेच्या उच्च स्तराला प्राप्त करण्याच्या पद्धतींचे वर्णन केलेले आहे, सामाजिक संबंध राखण्याचे

मार्ग देखील नमूद केले आहेत, शत्रूंशी वागण्याचे मार्ग देखील सांगितलेले आहेत, समाजातील दुर्बल लोकांच्या अधिकारांची पूर्तता करण्याचे मार्ग देखील वर्णन केले आहेत, स्त्रियांचे हक्क पूर्ण करण्याचे मार्गही सांगण्यात आले आहे. भविष्यात साकारल्या जाणाऱ्या नवीन आविष्काराविषयी आणि त्यांच्याकडून मानवांचा लाभ घेण्याबद्दलही खबर दिली. पृथ्वी आणि आकाशात काय अस्तित्वात आहे हे समजून घेण्याविषयी मार्गदर्शन केले, आज माणसाची बुद्धी आणि ज्ञान जिथपर्यंत पोहचत आहे त्या प्रत्येक गोष्टीचे वर्णन केले आहे, किंबहुना भविष्यात उद्‌भवणाऱ्या गोष्टींबाबतही सूचना देण्यात आली, ज्याबद्दल १४०० वर्षांपूर्वी मनुष्य अनभिज्ञ होता आणि त्यापूर्वीच्या पिढीने तर अजिबात समजू शकला नसता पण सर्वोत्तम पुरुष आणि खातमुन्नबियीन हजरत मुहम्मद मुस्तफा (स.) यांची दूरदृष्टी या सर्व गोष्टींना समजत होती. कारण ते एक परिपूर्ण अध्यात्म प्रकाश होते जे स्वतः परमेश्वराच्या प्रकाशाद्वारे प्रकाशमय झाले होते आणि ज्यांनी या प्रकाशाद्वारे आपल्या सोबतींना त्यांच्या क्षमतेनुसार प्रकाशित केले. त्यांना (सोबतींना) उपासनेची पद्धत दाखवून दिली आणि त्यास साध्य करण्यास मदतही केली. आणि जन्माचा हेतू समजून घेण्याकडेही त्यांचे लक्ष वेधले. आणि मग प्रेषित मुहम्मद (स.) पासून तो प्रकाश प्राप्तकरून सोबतींनी आपल्या क्षमतेनुसार तो प्रकाश प्रसारित केला आणि मग एक दिवापासून अनेक दिवे तेवत गेले आणि त्या काळातील सामान्य माणसाला समजत नसलेल्या गोष्टींबद्दलही अवगत करण्यात आले की या परिपूर्ण ग्रंथाद्वारे निवाडाच्या दिवसापर्यंत प्रकाशझोत प्रज्वलित होत राहील आणि भविष्यातील श्रद्धावंत लोक सर्वशक्तिमान अल्लाहचे हे उदंड आशीर्वाद पाहतील. सांसारिक व्यक्ती केवळ जगाच्या नजरेतूनच पाहील, पण एक खराखुरा श्रद्धवान, त्याच्या

जन्माचा उद्देश पूर्ण करत, त्यांच्याकडे (आशीर्वादाकडे) या दृष्टिने पाहील की परमेश्वराच्या भविष्यवाणीनुसार या गोष्टी आज जन्माला आल्या आहेत. श्रद्धावंताचे डोळे या आविष्कारांपासून आणि या ऐहिक गोष्टींपासून ऐहिक फायद्यांपर्यंत मर्यादित राहणार नाही; किंबहुना आपल्या जन्माचा उद्देश जाणून घेत, या खऱ्याखुऱ्या प्रकाशाचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतील, जो अल्लाहचा सर्वात प्रिय संदेष्टा आणि सर्वोत्तम पैगंबर घेऊन आला होता. ज्याप्रमाणे पथभ्रष्ट आणि अंधारात हरवलेल्या लोकांना १४०० वर्षांपूर्वी या पैगंबराच्या प्रकाशाचा फायदा झाला आणि त्यांनी प्रत्येक क्षेत्रातील शिखर गाठायला सुरुवात केली; त्याचप्रमाणे, जो या पैगंबराशी आणि या परिपूर्ण ग्रंथाशी कयामतपर्यंत प्रामाणिक संबंध प्रस्थापित करेल, तो निःसंदेह अंधारातून प्रकाशाकडे जाल आणि इहलोक व परलोकातील स्वर्गाचा वारस होईल.

सर्वशक्तिमान अल्लाहने सुरह तलाक च्या १२ व्या आयतीमध्ये सांगितले आहे की,

رَسُوْلًا يَّتْلُوْا عَلَيْكُمْ اٰيٰتِ اللّٰهِ مُبَيِّنٰتٍ لِّيُخْرِجَ الَّذِيْنَ
اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ مِنَ الظُّلُمٰتِ اِلَى النُّوْرِ۔ وَمَنْ
يُّؤْمِنْ بِاللّٰهِ وَيَعْمَلْ صٰلِحًا يُّدْخِلْهُ جَنّٰتٍ تَجْرِىْ مِنْ تَحْتِهَا
الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَآ اَبَدًا۔ قَدْ اَحْسَنَ اللّٰهُ لَهٗ رِزْقًا

प्रेषित, जो अल्लाहची सुस्पष्ट वचने यासाठी तुम्हाला ऐकवीत आहे की त्यास जे श्रद्धा बाळगत आहेत व सत्कर्मे करीत आहेत त्यांना प्रत्येक प्रकारच्या अंधःकारातून प्रकाशात आणता यावे. आणि जो कोणी अल्लाहवर श्रद्धा ठेवतो व सत्कर्मे करतो त्यास तो अशा उपवनांत प्रविष्ट करील, ज्यांच्यामधून नद्या वाहत असतील, आणि तो तेथे सदैव वास करील. अल्लाहने निःसंशय त्याच्यासाठी उत्तम उपजीविका प्रदान केलेली आहे. (अत् तलाक १२)

म्हणून, जर अल्लाहची मर्जी संपादन करायची असेल, तर पवित्र पैगंबर (स.) चे अनुकरण आणि त्यांच्यावर अवतरलेल्या शिक्षणावर अमंलबजावणी करणे देखील अनिवार्य आहे. या शिक्षणाचे काटेकोर पालन आणि प्रेषितांचे अनुकरण हेच तुम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडे नेत सर्वशक्तिमान अल्लाहची मर्जी व प्रसन्नता प्राप्त करण्यास कारणीभूत ठरेल. या प्रकाशझोत पासून लाभान्वित होणाऱ्यांसाठी परमेश्वराने श्रद्धेसह सद्वर्तने करण्याची अट घातली आहे. फक्त श्रद्धा ठेवणे पुरेसे नाही. श्रद्धावंताने सद्वर्तनाकडे नेहमी मार्गस्थ होणे अत्यावश्यक आहे. उपद्रव आणि अत्याचारापासून परावृत्त राहण्याची आवश्यकता आहे. मी सुरुवातीला जी आयत पठण केली होती त्यामध्ये अल्लाहने स्पष्टपणे सांगितले आहे की अल्लाहवर विश्वास, त्याच्या प्रेषितावर विश्वास आणि पवित्र कुरआनावर विश्वास बाळगणे हेच प्रकाशातून लाभान्वित होण्याचे साधने आहेत, उपवनाचे वारस होण्याचे साधने आहेत. अल्लाहला माणसाच्या प्रत्येक कृतीबद्दल परिपूर्ण ज्ञान आहे. त्याला माहित आहे की, मनुष्य परमेश्वराची, त्याच्या प्रेषिताची आणि ग्रंथाची कितपत अंमलबजावणी करत आहे. त्याची श्रद्धा अंतःकरणातून आहे की फक्त शब्दरूपी आहे. म्हणून, सर्वशक्तिमान अल्लाह, ज्याने पवित्र पैगंबर अवतरुन मानवांवर उपकार केले, ज्यांची शिकवणच माणसासाठी इहलोक आणि परलोकासाठी मोक्षाचे एकमेव साधन आहे, तर अशा परिस्थितीमध्ये, ते लोक, जे श्रद्धावान होण्याचा दावा करतात त्यांनी या संपूर्ण आणि परिपूर्ण शिकवणूकीचे पालन करणे आवश्यक आहे. आणि मग अल्लाहची कृपा पाहा की, وَآخَرِيْنَ مِنْهُمْ (अल-जुमा ४) ची बातमी देऊन श्रद्धावंतांना दिलासा दिला की पवित्र पैगंबर (स.) आणि पवित्र कुरआन ची विपुलता, वैभव आणि तेज पुढेही कायम

राहील. अंधाराच्या काळानंतर, पवित्र पैगंबराचे (स.) चे अत्यंत निष्ठावान दास आणि पवित्र पैगंबराकडून सर्वात अधिक प्रकाश प्राप्त करणारी व्यक्ती अर्थात अपेक्षित मसीह व महदी च्या हस्ते तिमीराकडून तेजाकडे मार्गक्रमण करता येईल. तो अपेक्षित मसीह आणि महदी पुन्हा मुसलमान आणि उर्वरित जगाला अत्याचार आणि कर्मठ अंधारातून बाहेर काढेल, आणि जो कोणी त्याच्याबरोबर सामील होईल, त्यास स्वीकारेल, त्याच्याशी प्रामाणिक राहील आणि ऐहिक मोह-माया त्याग करून त्याच्याशी केलेल्या करारांशी निष्ठावंत राहील तो नक्कीच परमेश्वराच्या बक्षीसांचा आणि स्वर्गाचा वारस ठरेल.

म्हणूनच, जिथे एक अहमदी या प्रमाणांना पाहून समाधानी होतो, तिथेच त्याला चिंता देखील आहे. आणि म्हणून आत्मनिरीक्षणाची गरज आहे. या प्रकाशाचा लाभ घेण्यासाठी, अल्लाहने يُؤْمِنْ بِاللّٰهِ وَيَعْمَلْ صَالِحًا (अत् तगाबुन १०) अर्थात-अल्लाहवर विश्वास ठेवून सत्कर्मे करण्याची अट निश्चित केलेली आहे. त्यामुळे कोणते काम चांगले आणि कोणते चांगले नाही हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. काहीं गोष्टी साहजिकच लहान असतात. उदाहरणार्थ, सुखाचे क्षण आहेत. सुखाचे क्षण साजरा करण्यासाठी आपल्या काय मर्यादा आहेत आणि दुःखाच्या वेळी आपल्या काय मर्यादा आहेत हे निरखूण पाहणे आवश्यक आहे. सुख आणि दुःख हे माणसाशी निगडित दोन महत्त्वपूर्ण भाव आहेत आणि या दोन्ही भाव प्रकट करण्यास काही मर्यादा आणि बंधने आहेत.

आजकाल पहा, सुखाच्या वेळी, मुसलमानांमध्ये विविध प्रकारचे नव-नवीन प्रथा आणि परंपरा रूढ झाल्या आहेत आणि दुःखाच्या क्षणातही वेगवेगळया परंपरा आणि विधी उद्धवलेले आहेत. पण एका अहमदीने या

गोष्टी लक्षात ठेवायला हवे आहे की तो जो काही काम करत आहे, त्याचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे फायदा दिसला पाहिजे. आणि त्याचे सर्व कार्य सर्वशक्तिमान अल्लाह आणि पवित्र पैगंबर (स.) यांच्या आदेशांच्या मर्यादे मध्ये होणे अनिवार्य आहे.

मी जे सुख आणि दु:ख वर्णन केले आहे, त्यातील सर्वात प्रसिद्ध आणि नावाजलेला उत्सव म्हणजे विवाह समारोह आहे. सुखाच्या प्रसंगापैकी हा एक मोठा समारोह आहे; आणि एक जबाबदारी देखील आहे ज्यास पूर्ण करणे आवश्यक असते. एकदा जेव्हा पवित्र पैगंबर (स.) चे काहीं सोबती म्हणाले की, आम्ही परमेश्वराच्या उपासनेसाठी आयुष्यभर लग्न करणार नाही. तर पवित्र पैगंबर (स.) नी त्यांचा विरोध करत म्हणाले होते की, ''सदाचरण तोच जो माझ्या वर्तनानुसार आणि शिकवणूकीनुसार असेल. आणि पहा मी लग्नही केले आहेत, मी उपवासही पाळतो आणि उपासनाही करतो.''

(बुखारी किताबुन्निकाह, बाब अत्तरगीब फिन्नीकाह हदीस क्रमांक -५०६३)

आणि पवित्र पैगंबर (स.) च्या उपासनेची गुणवत्ता कल्पनेच्या पलीकडे आहे. म्हणून, मुस्लिमांसाठी अनिवार्य आहे की, जर कोणत्याही प्रकारची अडचण नसेल, अडसर नसेल तर निश्चितपणे लग्न करावे. परंतु या विवाह सोहळ्यात काहीं विधी विशेषतः पाकिस्तान आणि हिंदुस्थान समाजात प्रचलित झाले आहेत, ज्यांचा इस्लामी शिकवणीशी काहीही संबंध नाही.

आणि अशा विधी पार पाडण्यासाठी इतका खर्च केला जातो की, ज्या समाजात हे विधी मोठ्या थाटामाटात पार पडतात, तिथे असा विचार निर्माण झाला आहे की कदाचित हे देखील विवाहातील एक आवश्यक परंपरा आहे की काय, ज्याखेरीज लग्न पूर्ण होत नाही.

मेहंदीची एक विधी आहे, यालाही लग्नासारखे महत्त्व दिले गेले आहे. या विधीसाठी नियोजकपणे आमंत्रण दिले जातात, कार्ड छापले जातात, स्टेज सजवले जातात आणि एवढेच नाही तर मेजवानीची प्रक्रिया अनेक दिवस चालू राहते आणि ती लग्नाच्या आधीच सुरू होते. कधीकधी ते कित्येक आठवडे अगोदर सुरु होते आणि दररोज एक नवीन स्टेज सजवला जातो आणि नंतर त्याबद्दल प्रतिक्रिया दिली जाते की, आज इतके व्यंजन तयार करण्यात आले आणि उद्या इतके तयार केले जाईल. हे सर्व विधी आहेत ज्यांनी दुर्बल लोकांना आपल्या विळख्यात सामावून घेतले आहे आणि परिणामस्वरुप असे लोक पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली गुदमरतात. बिगर अहमदी तर हे करतच होते; पण आता काहीं अहमदी कुटुंबांमध्येही हे निरर्थक आणि वाईट विधीं मोठ्या प्रमाणावर रुजू लागल्या आहेत किंवा काही कुटुंब यात गुंतलेले आहेत, असे निदर्शनास आलेले आहे. आणि अपेक्षित मसीहाला स्वीकारल्यानंतर अशा सर्व गैर इस्लामी विधींपासून परावृत्त राहण्याऐवजी समाजाचे अनुसरण करत या विधींमध्ये अडकत चालले आहेत.

काही महिन्यांपूर्वी, मी स्पष्टपणे सांगितले होते की, मेहंदी समारंभात अतिरिक्त खर्च आणि मोठ्या मेजवानी टाळल्या पाहिजेत. तर त्याच दिवशी लंडनमधील एका अहमदीच्या घरात मेहंदीची मेजवानी (दावत) होती. जेव्हा त्यांच्या कानापर्यंत माझे हे शब्द पोहोचले त्याच क्षणी त्यांनी मेजवानी रद्द केली आणि मुलीच्या काही मैत्रींना बोलावून त्यांना जेवण दिले आणि बाकीचा जेवण बैतुल फतुह येथे एका कार्यक्रमात हजर असलेल्या लोकांसाठी पाठवून दिले. हे आहेत ते अहमदी, जे उपदेश केल्यावर त्वरीत सकारात्मक प्रतिसाद देतात आणि नंतर माफीची पत्रेही लिहितात.

पण मला पाकिस्तानमधून आणि विशेषतः रब्वाहमधून काहीं तक्रारी आल्या आहेत. काही लोक या विधींमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त पडू लागले आहेत आणि रब्वाह हा एक लहान शहर असल्याने तिथल्या घडामोडी लगेच निदर्शनास येतात. म्हणून आता मी स्पष्टपणे सांगत आहे की, या निरर्थक आणि घाणेरड्या विधींचे पालन करू नका आणि त्यांना लगेच बंद करा.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) एकदा म्हणाले होते: ''आमच्या लोकांमध्ये एक वाईट विधी आहे की ते लग्नांमध्ये शेकडो रुपयांची उधळपट्टी करतात.''

(मजमुआ इश्तीहारात खंड -१ पृष्ठ ७०)

आजपासून शंभर वर्षांपूर्वी किंवा त्याहून अधिक पूर्व, शेकडो रुपयांचा खर्चही मोठा खर्च मानला जात होता. पण आजकाल, शेकडो काय लक्षावधी रूपये खर्च केले जात आहेत आणि आपल्या ऐपतीपेक्षा अधिक खर्च करत आहेत. आणि आज हा खर्च जुण्याकाळातील खर्च पेक्षाही अधिक आहे. आणि पहा 'फटाकेबाजी (इस्लाममध्ये) तर अवैध (हराम) आहे.'

(मल्फूज़ात खंड - ५ पृष्ठे - ४९ नवीन आवृत्ती)

लग्नात फटाके फोडले जातात. आता लोक लग्नाच्या दिवशी घरांमध्ये पुष्कळ प्रमाणात चिराग (विद्युत दिवे) पेटवतात. एकीकडे पाकिस्तानात हा गोंगाट आहे आणि प्रत्येक पाहुणा हेच सांगत असतो, वर्तमानपत्रामध्ये देखील हीच बातमी नेहमी दिसते, की विजेचा तुटवडा आहे. लोडशेडिंग अनेक तास चालते, महागाईमुळे बिकट परिस्थिती उद्भवली आहे आणि दुसरीकडे काहीं कुटुंब गरजेपेक्षा जास्त खर्च करून देशाचे नुकसान

तर करत आहेत; तर या पुढे जाऊन अपराधही करत आहेत. म्हणून, सर्वसाधारणपणे पाकिस्तानमध्ये, अहमदींनी कोणतीही उधळपट्टी होऊ नये याची खबरदारी घेतली पाहिजे आणि विशेषतः रब्वाहमध्ये याची दक्षता बाळगली पाहिजे. तसेच रब्वाहमधील स्थानिक अधिकारींची जबाबदारी आहे की लग्नात उधळपट्टी, देखावा आणि एखाद्याचा अभिमान आणि वैभव व्यक्त होणाऱ्या प्रसंगांचे निरीक्षण करावे आणि असे घडण्यापूर्वीच त्यांना थांबवावे. अहमदी लोकांवर अल्लाहची कृपा आहे की ते शोकांत समयी घडणाऱ्या विधी पासून दूर आहेत; सातवां, दसवां, चाळीसवां, हे बिगर अहमदींनी जन्म दिलेल्या निरर्थक विधीं आहेत. आणि हे निरर्थक विधीं आप्तपरिवारासाठी विनाकारणाचे एक ओझे बनून जातात. यापासून अहमदी सुरक्षित आहेत; परंतु जर समाजात रूजलेल्या एखाद्या वाईट विधी मध्ये जर तुम्ही अडकलात, तर दुसऱ्या प्रकारच्या विधींकडेही वळण्याची शक्यता असते आणि कालांतराने ते आमच्यात वाढत जाईल.

म्हणून, प्रत्येक अहमदीने आपली स्थिती समजून घेतली पाहिजे की सर्वशक्तिमान अल्लाहने त्याला अपेक्षित मसीह व महदीच्या जमाअत मध्ये सामील होण्याचे आर्शीवाद प्रदान केले आहे. आता इस्लामी शिकवणींचे पालन करणे हेच त्याचे कर्तव्य आहे. विवाहसोहळ्याबद्दल इस्लामिक शिकवणूकींनुसार सर्वात महत्त्वाचा कार्य आहे विवाह समारोह आणि याकरिता एक समारंभ आयोजित करणे उत्तम आहे. जर क्षमता असेल तर भोजनाचे कार्यक्रम सुद्धा आपल्या सामर्थ्यानुसार करण्यात कोणताही गुन्हा नाही. हे देखील बंधनकारक नाही की येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांना भोजन दिले पाहिजे, जर वरात दुरून येत असेल तर त्यांना भोजन दिले जाऊ शकते. परंतु जर देशातील नियम याची परवानगी देत नसेल, तर त्यापासून परावृत्त राहणे

बरे आणि एका मर्यादित संख्येला, ज्यामध्ये फक्त आपल्या कुटुंबातील किंवा वरातीचे लोक असेल, त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली पाहिजे. कारण पाकिस्तानमध्ये एकेकाळी न्यायालयाने बंदी घातली होती. आता परिस्थिती काय आहे हे मला माहित नाही, तरीही काही प्रमाणात प्रतिबंध आहेतच.

दुसरे आणि महत्त्वाचे घटक आहे वलीमा ('वर' च्या वतीने आयोजित केलेले कार्यक्रम), जो अस्सल कर्तव्य आहे, ज्यामध्ये आपल्या लोकांना कार्यक्रमामध्ये आमंत्रित केले जाते. खरे पाहिल्यास, इस्लाममध्ये लग्नाच्या मेजवानीचा हा एकमेव आदेश आहे. पण ते देखील खूप मोठ्या प्रमाणावर असणे आवश्यक नाही; (ऐवजी) क्षमतेनुसार, लोकांना आमंत्रण देणे उत्तम आहे.

म्हणून, मी म्हटल्याप्रमाणे, सर्वशक्तिमान अल्लाहने आम्हाला स्पष्टपणे जन्माचा उद्देश सांगितलेला आहे. आमचा प्रत्येक कार्य, जो सद्वर्तन समजून आणि परमेश्वराची मर्जी संपादन करण्याच्या उद्देशाने केला जातो, तो उपासनेच्या श्रेणीत पडतो. जर आपण प्रत्येक कार्य या उद्देशाला अनुसरुन केले तर नक्कीच आम्हाला अल्लाहची प्रसन्नता प्राप्त होईल आणि आमचे अस्तित्व टिकून राहतील आणि सर्व प्रकाराच्या अत्याचारापासून आम्ही सुरक्षित राहू. सर्व बिदात्त (धर्मात अवैध नूतनीकरण), उधळपट्टी, वायफळ विधी आणि सर्व प्रकारच्या अत्याचारापासून आम्ही सुरक्षित राहू शकतो. एक तर हे लोक नकळत अशा व्यर्थ आणि लाभहीन विधीं मध्ये अडकून स्वतः वर अत्याचार करतात आणि मग समाजात याला चालना देऊन गरीबांवर अत्याचार करत असतात, त्यांना (गरीब लोकांना) असे वाटते की ही विधी आवश्यक विधींपैकी एक आहे की काय! आणि ज्या समाजात अशा व्यर्थ गोष्टी आणि बिदात्त रुजू लागतात तो समाज एकमेकांच्या

हक्कांचा वध करणारा आणि मग मी म्हटल्याप्रमाणे, एकमेकांवर अत्याचार करणारा बनतो. परंतु जर आम्ही या गोष्टींपासून परावृत्त राहिलो तर लोकांचे हक्क हरण करण्यापासूनही परावृत्त राहू आणि अल्लाहची मर्जी संपादन करणारे होवू. आणि आज अल्लाहची मर्जी, प्रसन्नता आणि इतरांचे अधिकार स्थापित करण्याची जबाबदारी अहमदींपेक्षा अधिक कोण करण्याची हमी देऊ शकतो. आज अहमदी व्यतिरिक्त, कोणता समाज आहे ज्याने प्रत्येक प्रकारच्या निरर्थक विधी आणि मोहाचा त्याग करण्याचा निर्धार केला आहे. आज, अहमदी व्यतिरिक्त, कोण आहे ज्याने हा करार केलेला आहे की, आम्ही आमचे जीवन पवित्र कुरआन च्या आदेशांनुरुप व्यतित करु. आणि आज अहमदीं व्यतिरिक्त कोण आहे जो अल्लाह आणि पवित्र पैगंबर(स.) यांच्या वचनांना आदर्श मानून त्याप्रकारे जीवन जगत आहे.

म्हणूनच, जेव्हा अहमदींनी युगाच्या अवताराला स्वीकारुन त्याच्याशी बांधलेल्या करारांचा आज्ञाधारी होण्याचा निश्चय केला, तेव्हा आपल्या करारांची पूर्ती करणे त्याच्यावर बंधनकारक आहे. आणि या करारांवर अंमलबजावणी करून आम्ही स्वतःला बंधिस्त करीत नाहीत तर सैतानाच्या तावडीतून स्वतःला मुक्त करत आहोत. आणि अल्लाह आणि पवित्र पैगंबरांच्या वचनांचे पालन करून स्वतःचे संरक्षण करत आहोत, आपल्या बुद्धीमत्तेला सार्थ करत आहोत. आपल्या सन्मानाचे आणि पावित्र्याचे रक्षण करत आहोत. आपल्या शालीनतेला उंचावत आहोत, संयम आणि सद्वर्तनेचे वैशिष्टे अंगीकारण्याचे सामर्थ्य निर्माण करत आहोत. सदाचरण आणि नैतिकतेमध्ये प्रगतीशील होण्याचे प्रयत्न करत आहोत. श्रद्धेमध्ये प्रगतीशील होण्याचा प्रयत्न करत आहोत. परमेश्वराच्या नाखुशी चा भय बाळगत आणि त्याचे प्रेम प्राप्त करण्यासाठी एकनिष्ठ

होऊन त्याच्या समक्ष नतमस्तक होत आहोत जेणेकरून आम्ही आमच्या जन्माचा उद्देश साध्य करू शकू. म्हणून, जर तुम्हाला अंधारातून बाहेर पडून प्रकाश मिळवायचा असेल आणि काळाच्या इमामाला स्वीकारुन त्याच्याशी बांधलेल्या करारांचा योग्य मोबदला मिळवायचा असेल तर तुम्हाला भौतिक साधन संपत्तीची हौस सोडून देणे गरजेचे आहे. तुमच्या अंतःकरणात एक पवित्र बदल आणणे आवश्यक आहे. आणि शालीनतेमध्ये अत्योच्च शिखर गाठण्याचा प्रयत्न करणे अपरिहार्य आहे.

'(हया)' शालीनतेच्या प्रगतीबद्दल मी अधीच बोललो आहे. शालीनता हा देखील श्रद्धेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. जसे मी सुरुवातीला सांगून आलो की, अर्वाचीन आविष्कार, उदा. टीव्ही, इंटरनेट इत्यादींमुळे शालीनतेचा दर्जा वेगाने घसरत चालला आहे. उघडउघड अश्लीलता दाखवल्यानंतरही म्हणतात की यामध्ये कोणत्याही प्रकारची अश्लीलता नाही. म्हणून एका श्रद्धावंत अहमदीची स्थिती अन्य टीव्ही आणि इंटरनेट पाहणाऱ्यांपेक्षा शालीन असणे आवश्यक आहे. ही अश्लीलता नाही तर वासना आणि विलासाची कैद आहे. अति मोकळेपणा आणि हिजाबरहित वातावरणामुळे काही शरीफ अहमदींच्या घरांत देखील शालीनतेचे प्रमाण घसरत चालले आहे. प्रगतीच्या नावाखाली अशा काही गोष्टी केल्या जातात, अशी कृत्ये केली जातात, जो कोणीही सभ्य पुरुष, मग ते पती-पत्नी का असेना, पाहू शकत नाही. काही कृत्ये अशी असतात की जेव्हा इतरांसमोर केली जातात तेव्हा ती केवळ बेकायदेशीरच नव्हे तर अपराध समजले जाते. जर अहमदी लोकांनी या बीभत्सपणापासून आपली घरे स्वच्छ ठेवली नाहीत, तर पावित्र्य आणि शालीनतेपासून ते दूर होत जाईल आणि दीक्षा घेताना केलेल्या करारांचाही ते विश्वासघात करणारे ठरतील; तो करार जो

त्यांनी अपेक्षित मसीहाला स्वीकारताना केला होता.

पवित्र पैगंबर (स.) ने अगदी स्पष्टपणे सांगितले आहे की,

اَلْحَيَآءُ شُعْبَةٌ مِّنَ الْاِيْمَانِ

अर्थात- हया (शालीनता) सुद्धा श्रद्धेचा भाग आहे.

(मुस्लिम किताबुल इमान, बाब शाबुल इमान आणि अफजलुहा, हदीस क्रमांक ५९)

म्हणून, प्रत्येक तरुण अहमदीने विशेषकरुन लक्षात ठेवायला हवे की आजच्या माध्यमांद्वारे अनैतिक कार्यक्रमांना पाहून त्यांच्या विळख्यात अडकू नये अन्यथा तुम्हाला श्रद्धेपासून काहीही प्राप्त होणार नाही आणि या अश्लीलतेचा परिणाम असा होतो की यामध्ये रम्य झालेले पुढे समाजाने निर्धारित केलेल्या सर्व मर्यादा ओलांडतात आणि परिणामस्वरुप त्यांना जमाअत मधून निष्कासित करण्याची शिक्षा भोगावी लागते. म्हणून, हे नेहमी लक्षात ठेवायला हवे की, माझे प्रत्येक कर्म परमेश्वराची मर्जी संपादन करण्यासाठीच असावे.

एक हदीसमध्ये याचा उल्लेख करत पवित्र पैगंबर (स.) म्हणतातः ''अश्लीलता प्रत्येक उपभोगाला कुरूप करते तर शालीनता सौंदर्य आणि पवित्र चरित्र प्रदान करते.''

(तिर्मिधी किताबुल बिर्रे वा सिला बाब- मा जा फिल फुहशे वट्टाफहहुश हदीस क्रमांक १९७४)

हे सौंदर्य, व्यक्तिच्या सत्कर्मामुळे आणि सद्भावनेमुळे निर्माण होते.

एक ठिकाणी पवित्र पैगंबर (स.) म्हणालेः अल्लाहची हया मनात असली पाहिजे जसे की त्याची हया (लज्जा) बाळगण्याचा अधिकार आहे. सोबतीं म्हणाले, अल्लाहचे आभार आहे की त्याने आम्हाला शालीनता प्रदान

केली. पवित्र पैगंबर (स.) म्हणालेः तसे नव्हे, तर खरी शालीनता त्यास म्हणावे जेव्हा एक व्यक्ती आपल्या अंतःकरणात येणाऱ्या विचारांचे रक्षण करत असेल आणि पोटात जाणारे अन्नाचे रक्षण करत असेल (वैध मार्गाने मिळवलेला धन). मृत्यू आणि संघर्ष लक्षात ठेवणे आवश्यक आहे. जो मनुष्य परलोकाची इच्छा बाळगतो तो ऐहिक जीवनाच्या त्याग करतो. म्हणून ज्याने ही जीवनपद्धत स्वीकारली त्याने खरोखरच परमेश्वराची लाज धरली.
(तिर्मिधी किताब सिफातील-कयामते वर्रकायके वलवराय, बाब- ८९/२४, हदीस क्रमांक- २४५८)

हा पवित्र पैगंबर (स.) चा आदेश आहे. म्हणून, मनात येणारा प्रत्येक विचार अल्लाहची लाज ध्यानात ठेवून आणायला हवं. एखादी वाईट कल्पना आली तरी त्याला लगेच दूर केलं पाहिजे. त्याला इस्तगफार (क्षमायाचना) द्वारे बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विचार शुद्ध असले की कृती देखील शुद्ध होते. आणि मग अशा व्यक्तिवर वाईट गोष्टींचा कोणताही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे मानवानेही हलाल (वैध) माध्यमाचा वापर आपल्या उपजीविकेसाठी केला पाहिजे. इतरांचे पैसे हिसकावण्याचा किंवा चूकीच्या मार्गाने पैसे कमवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी कठोर परिश्रम आणि कष्टातून पैसे कमवण्याचा प्रयत्न करावं. पाकिस्तान इत्यादीं भागांमध्ये लाचखोरी वगैरे अगदी सामान्य आहे. या प्रकारची कमाई अवैध मानली जाते. पवित्र पैगंबर (स.) यांनी सांगितले आहे की, ''तु तुझ्या पोटात जो अन्न टाकतो त्याचे संरक्षण कर.'' म्हणूनच, योग्य मार्गाने कमाई करा आणि स्वतः आणि परिवाराचे वैध मार्गाने पोषण करा . कारण असेच लोक नंतर अल्लाह आणि त्याच्या प्रेषितावर खरी निष्ठा बाळगतात.

हजरत अपेक्षित मसीहाची एक प्रार्थना आहे. ही प्रार्थना परमेश्वराचे

सन्निध्य प्राप्त करण्यासाठी रचली गेली होती. त्या प्रार्थनेचे शब्द असेः
''हे माझ्या प्रिय देवा, माझ्या प्रिय मार्गदर्शका! तू आम्हाला तो मार्ग दाखव ज्याद्वारे नीतिमान लोक तुला प्राप्त करतात आणि आम्हाला अशा सर्व मार्गांपासून वाचव ज्यांचे ध्येय फक्त वासना, हेवा, द्वेष, मत्सर आणि जगाचा लोभ आहे.''

(पैगाम ए सूलह, रूहानी खजाईन, खंड -२, रब्वाह येथून प्रकाशित)

म्हणून, आपल्या करारांशी एकनिष्ठ राहून आणि दीक्षेचे पालन करून खऱ्याखुऱ्या श्रद्धावंतांमध्ये सामील होण्याची पराकाष्ठा करा. नेहमी लक्षात ठेवा की आम्ही त्या प्रेषिताचे अनुयायी आहोत ज्यानी आम्हाला योग्य मार्ग दाखवला, आम्हाला चांगले आणि वाईट शिष्टाचार शिकविले. आणि या नंतर जर आम्ही पुन्हा ऐहिक लोभ आणि वाईट व अवैध परंपरांमध्ये गुंतवूण राहिलो, तर परमेश्वराचे उचित हक्क आणि त्याच्यापासून मिळणाऱ्या प्रकाशापासून वंचित राहू.

पवित्र कुरआन मध्ये परमेश्वराने पवित्र पैगंबर (स.) च्या संदर्भात नमूद केले आहे की,

يَأْمُرُهُم بِالْمَعْرُوفِ وَيَنْهٰهُمْ عَنِ الْمُنْكَرِ وَيُحِلُّ لَهُمُ الطَّيِّبٰتِ وَيُحَرِّمُ عَلَيْهِمُ الْخَبٰٓئِثَ وَيَضَعُ عَنْهُمْ اِصْرَهُمْ وَالْاَغْلٰلَ الَّتِىْ كَانَتْ عَلَيْهِمْ۔

अर्थात-तो पवित्र पैगंबर (स.) त्यांना भलाईचे आदेश देतो आणि वाईट करण्यास त्यांना प्रतिबंध करतो, आणि चांगल्या गोष्टी त्यांच्यासाठी वैध ठरवतो आणि वाईट गोष्टी त्यांच्यासाठी निषिद्ध ठरवतो, आणि त्यांच्यावर असलेले ओझे आणि त्यांच्या बेड्या दूर करतो. (अल् आराफ़ १५८)

ते ओझे जे पूर्व राष्ट्रां आणि वंशांवर होते आणि ज्याप्रकारे धर्म विधींना विसरुन अवैध आणि स्वगठित परंपरा व रूढींमध्ये व्यस्त होऊन

यहूदी आणि ख्रिस्ती लोकांनी स्वतःवर ओझे आणि बेड्या घातल्या होत्या त्याचप्रकारचे बेड्या आज काहीं मुस्लिम समाजातही पहायला मिळतात. आणि जर आम्ही देखील या बेड्या मध्ये अडकून राहिलो तर पवित्र पैगंबर (स.) चा संदेश जगभरात प्रसारित करण्याचा उद्देश कशाप्रकारे पूर्ण होईल. म्हणून हे (तौक) बेड्या काढणे आवश्यक आहे.

आणि नेहमी आपल्यासमोर ही बाब ठेवणे आवश्यक आहे की, आम्ही ज्या पवित्र पैगंबराचे अनुकरण करत आहोत त्यांनी पहिल्यापासूनच आम्हाला वैध आणि अवैध मधील फरक समजावून चूकीच्या दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या गळ्यातील बेड्या काढून टाकल्या आहेत. पण मी म्हटल्याप्रमाणे, हे मुस्लिमांचे दुर्दैव आहे की हे स्पष्ट आदेश असूनही काही गोष्टी अजूनही त्यांच्या गळ्यात बेड्याच्या स्वरूपात अडकून आहेत.

पण आम्ही हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) ला स्वीकारल्यानंतर, हे वास्तव पुन्हा समजून घेतले आहे की, ह्या बेड्यापासून मुक्ती कशी प्राप्त करावी. हे खरंच अल्लाहची आम्हांवर कृपा आहे की आम्ही कबरेवर होणाऱ्या पूजेपासून सुरक्षित आहोत. तसेच पीर परस्ती पासूनही सुरक्षित आहोत. एक दोन तक्रारी वगळता सर्व ठिकाणी अहमदी या सर्व दुष्ट आणि व्यर्थ रूढींपासून दूर आहात. परंतु जसे मी पूर्वी सांगून आलो आहे, काहीं गोष्टी आमच्यात रुजू लागली आहेत. जर का आम्ही या विषयात सावधगिरी बाळगली गेली नाही तर, या निरर्थक बेड्यामध्ये आम्ही पुन्हा एकदा अडकून जासाल, ज्यांना पवित्र पैगंबर (स.) नी आमच्या गळ्यातून काढले होते आणि ज्याला परिपूर्ण त्याग करण्याचे उपदेश हजरत अपेक्षित मसीह यांनी या युगात देत म्हणाले होते की जर तुम्ही यापासून परावृत्त राहिले नाही तर सदाचरणापासून दूर होत जाल. आणि जर अशी परिस्थिती उद्भवली

तर निश्चितच जमाअतपासूनही दूर होण्याचा संकट आमच्यावर असेल. कारण जमाअतशी तोच टिकून राहील, जो प्रकाशापासून लाभान्वित होत राहील आणि जो अल्लाह आणि त्याच्या पवित्र प्रेषित(स.) आणि पवित्र ग्रंथापासून लाभ घेत राहील. आणि जो अल्लाह, त्याच्या प्रेषित आणि ग्रंथापासून लाभ घेत नाही तो सहज त्या प्रकाशापासूनही दूर होत जाईल. आणि जो प्रकाशापासून लाभ घेण्याची तमा बाळगत नाही तो श्रद्धेपासूनही हळूहळू दूर होत जाईल. हा तर एक प्रकारचा चक्र आहे जो फिरत असतो. म्हणून, प्रत्येक वेळी आपल्या परिस्थितीचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.), जे स्वतः एक तेजस्वी प्रकाश होते आणि त्यांच्यावर आकाशातून प्रकाश अवतरला होता, ते अशी प्रार्थना करायचे की, हे अल्लाह! माझ्या हृदयात आणि माझ्या इतर भागांमध्ये (तुझे) प्रकाश ठेव.

(बुखारी किताबुद्दावात, बाब अद्दुआ इजिंतबाहू मिनलैल, हदीस क्रमांक -६६१६)

खरं पाहिलं तर ही प्रार्थना आम्हां सर्वांसाठी आहे की, जीवनातील प्रत्येक कार्य करत असताना आपले विचार, अवयव, चिंतन, मनन आणि अंगाचा प्रत्येक भाग परमेश्वराच्या शिकवणूकींच्या अधीन राखण्याचा प्रयत्न असावा आणि यासाठी प्रार्थना करा की आमच्या मनात नेहमी शुद्ध विचार वावरावे आणि परमेश्वराची मर्जी संपादन करण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

परमेश्वर आम्हाला त्याच्या शिकवणूकीनुसार कार्यरत असण्याचे सामर्थ्य प्रदान करो. आणि त्याच्या प्रेषिताने सांगितलेल्या आदेशांचे पालन करण्याची शक्ति प्रदान करो. आम्ही प्रत्येक वाईट आणि अधार्मिक रित्यापासून अलिप्त राहून; ऐहिक मोह-माया पासून दूर राहून, परमेश्वराच्या प्रकाशापासून लाभन्वित होवो. आणि आमची कोणतीही चूक आम्हाला या तेजापासून दूर करण्याचे कारण ठरू नये. आमीन.